अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १८७ । सोमवार २० एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com


## साध्या साध्या गोष्टीवर आपण लक्ष ठेवल पाहिजे



'सहजयोग'
भाग ३२

परमेश्वराला बाजारात विकत घेऊ शकत नाही किंवा परमेश्वराचा जो मनुष्य असेल तर तो कोणत्याही प्रकारचा पैसा तुमच्या कडून घेऊ शकत नाही, जर त्याने तुमच्या कडून पैसे लुबाडले तर तो परमेश्वराचा मनुष्य नाही,मग तो कोणत्याही कारणांनी पैसे मागत असेल तर त्याला सरळ सांगायचं की हे बघा आम्हांला तुमचं काही कर्तव्य नाही ,दुसरी गोष्ट रोगराई वगैरे शहरातून जितकी आहे ,त्यामानाने ग्रामीण भागात कमी आहे ही आश्चर्याची गोष्ट आहे. त्याला कारण स्वच्छ हवा, वातावरण तसेच पवित्र कार्य सुद्धा आहे. लोकांची मन पवित्र आहेत. पण रोगराई दूर करण्यासाठी सुध्दा आमच्या सहजयोग्यांनी अत्यंत कार्य केलेले आहे ,आणि एकदा तुम्ही सहजयोगा मध्ये जर साक्षात्कारी पदवीला प्राप्त झालात तर तुम्हांला औषध डॉक्टर वगैरे काहीही नको,आणि मानसिक किंवा शारीरिक रोग नेहमी साठी निघून जातात. सहजयोगासाठी तुम्हाला काही पैसे दयायला नको, तुम्हाला त्याच्यासाठी काही विशेष मेहनत करायची नाही ,काहीच मेहनत नाही ,जस एखाद बी स्वतःच उपजत तस तुमच्यात असलेल बी अंकुरत. तुमच्या मध्येच ते अंकुर आहे, आणि त्या अंकुराला उजगारणारी कुंडलिनी अस नावं दिलेले आहे. - १८ डिसेंबर १९७६ मुंबई अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org ८८७१५१९१९१ सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## राष्ट्र सह्याद्री अहिल्यानगर जिल्हा कार्यालयाचे दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन







अहिल्यानगर : दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या नूतन जिल्हा कार्यालयाचे व व्हिडिओ चॅनल स्टुडिओचे उद्घाटन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते 'यशशिखरे' या विशेषांकाचे प्रकाशन पार पडले. उद्घाटन समारंभास भाजपनेते गोपीचंद पडळकर यांनी भेट देऊन संपादक काकासाहेब उर्फ करण नवले यांचा सत्कार केला. समवेत कार्यकारी संपादक पुनम नवले, वृत्तसंपादक किरण बोरुडे, व्यवस्थापक महादेव नजन, आकाश शिंदे, शिर्डी कार्यालय प्रमुख अशोक दुशिंग, दत्ता गाडगे यांच्यासह राष्ट्र सह्याद्री समूह.
**(छाया : योगेश कडस्कर, सोमनाथ डोळे, सोपान भगत)**

# नेवासा नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांवर गोळीबार!

## उपनगराध्यक्षांच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्यावर गोळीबार केल्याच्या आरोपावरून संजय लक्ष्मण सुखदान (रा. नेवासा) याच्याविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय सुखदान हे नेवासा नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षांचे पती आहेत.

मुख्याधिकारी निखिल फराटे यांनी अहिल्यानगर शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करून तो तपासासाठी नेवासा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्याची माहिती नेवासा पोलीस ठाण्याचे निरीक्षक महेश पाटील यांनी सांगितले. आरोपी संजय सुखदान याचा शोध घेत असल्याची माहिती त्यांनी दिली. गोळीबाराची घटना दि. १३ एप्रिलच्या रात्री पावणेआठच्या सुमारास घडली. मात्र मुख्याधिकारी फराटे यांनी काल, शनिवारी सायंकाळी तोफखाना पोलिसांकडे फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करून तो नेवासा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. आपण घाबरलो असल्याने लगेच तक्रार दिली नाही, असे मुख्याधिकारी फराटे यांनी नमूद केले आहे.

मुख्याधिकारी फराटे यांनी फिर्यादीत म्हटले की, संजय सुखदान यांनी यापूर्वीही नियमबाह्य कामासाठी दबाव आणला होता, त्यास नकार दिल्यानंतर त्याने चप्पल उगारून मारहाणीचा प्रयत्न केला होता. तसेच आम्ही सांगू तसे काम केले नाही तर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही दिली होती. दि. १३ एप्रिलच्या सायंकाळी नगरपंचायत **(पान ४ वर)**

## महत्त्वाचे..

### राहुरी, बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी सुट्टी जाहीर

राहुरी : बारामती आणि राहुरी विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीसाठी गुरुवारी २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघातील मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी बारामतीसह राहुरीत सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याबाबतीच अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाने जाहीर केली आहे. ही सार्वजनिक सुट्टी २०१- बारामती विधानसभा मतदारसंघ आणि २२३-राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या क्षेत्रासाठी आहे. तसेच या मतदारसंघातील जे मतदार कामासाठी त्या मतदारसंघाच्या बाहेर असतील त्यांना देखील लागू राहील. तसेच ही अधिसूचना राज्य व केंद्र शासनाचे कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम इतर प्रतिष्ठान यांनाही लागू राहील, असेही अधिसूचनेत नमूद करण्यात आली आहे.

# 'दत्तधाम दरबार' सील, अनेक औषधे ताब्यात

## गडगेला पाच दिवसीय कोठडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील वडगावपान येथील तथाकथित 'दत्तधाम दरबार' चालवणाऱ्या भोंदू राजेंद्र गडगे याच्याविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गडगेच्या दरबारावर पोलिसांनी छापा टाकत संपूर्ण परिसर सिल केला असून तब्बल चार तास झाडाझडती घेण्यात आली. या कारवाई दरम्यान दरबारात स्पॉट पंचनामा करण्यात आला. तसेच विविध औषधांचे नमुनेही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नागरिकांची फसवणूक आणि अंधश्रद्धा पसरवल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या राजेंद्र गडगेला न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सध्या या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असून गडगेच्या कथित दरबारामागील संपूर्ण जाळं उघड करण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून अंधश्रद्धेच्या नावाखाली भोंदूगिरी करणाऱ्यांचे



धाबे दणाणले आहेत. संगमनेरच्या भोंदू बाबाचा आणखी एक प्रताप समोर आला आहे. पोटाचा आजार दूर करण्याच्या आणि लग्न जमवून देण्याच्या नावाखाली या भोंदूनं बीडमधील तरुणाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासाठी भोंदूनं तब्बल २२ हजार रुपये उकळल्याची माहिती तरुणाने दिली. याबाबत तरुणाने भोंदू बाबाबाबत माजलगाव शहर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला आहे.

वडगावपान इथं मंत्रोच्चाराने दुर्धर आजार बरे करण्याचा दावा करणाऱ्या भोंदूला गजाआड करण्यात आलं आहे. दत्तधाम सरकार नावाने तो दरबार चालवत होता. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या भोंदूविरोधात गुन्हा दाखल केल्यानंतर संगमनेर पोलिसांनी राजेंद्र गडगेला अटक केली. आता त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

राजेंद्र गडगेच्या भोंदूगिरीचे अनेक कारनामे समोर आले आहेत. व्यवसायातील नुकसानासह, सांधेदुखी, मणक्याचा त्रास, कॅन्सरसारखे आजार मंत्राने बरे झाल्याचा दावा भोंदू राजेंद्र गडगे करायचा. त्याचे काही व्हिडीओ यूट्यूबवर अपलोड करायचा. गेल्या १० वर्षांपासून राजेंद्र गडगे हा व्यवसाय करत होता. या काळात त्याने शेकडो कुटुंबांचे आर्थिक, शारीरिक आणि मानसिक शोषण केल्याची माहिती देखील समोर येत आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) राज्य सचिव ॲड. रंजना गवांदे यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा केला. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनंतर संगमनेर तालुका पोलिसांनी राजेंद्र गडगेला अटक केली. पोलिसांनी मुख्य आरोपी राजेंद्र गडगे याच्यासह मधुकर शिंदे, गडगेची मुलगी ज्ञानेश्वरी गडगे, डॉ. मोहन पुरी आणि सुरज शिंदे यांना अटक केली आहे.

# बिबट सफारीमुळे निझर्णेश्वर परिसर पर्यटन नकाशावर : ना. विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वि :** मंदिराचा जीर्णोद्धार तसेच परिसरात विकसित होत असलेल्या बिबट सफारी प्रकल्पामुळे श्रीक्षेत्र निझर्णेश्वर देवस्थानचा परिसर तालुक्यातील मुख्य पर्यटन केंद्र ठरेल, असा विश्वास जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त केला.

श्रीक्षेत्र निझर्णेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धाराचा शुभारंभ मंत्री विखे आणि आ. खताळ यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी प्रवरा बँकेचे व्हाईस चेअरमन मच्छिंद्र थेटे, कैलास तांबे, तहसीलदार धीरज मांजरे, पोलीस उपअधीक्षक कुणाल सोनवणे, वनविभागाचे अमरजित पवार यांच्यासह मंदिराच्या विश्वस्त समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

निझर्णेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी निधीची कमतरता भासणार नाही, परंतु लोकांचा सहभागही यामध्ये राहिला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,



हे देवस्थान आता भाविकांसाठी श्रद्धेचे मुख्य केंद्र झाले आहे. मागील काळात मंदिराच्या परिसरात विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्यामुळे परिसराचा चेहरामोहरा बदलला आहे. भविष्यात मंदिराचे काम पूर्ण होईल, त्यावेळी या तीर्थस्थानाची भव्यता अधिक वाढेल.

या परिसरात असलेल्या वन विभागाच्या जागेवर बिबट सफारी प्रकल्प उभारण्यात येत असून, याचा आराखडाही आता तयार झाला आहे. बिबट सफारी प्रकल्पामुळे पर्यटकांची संख्याही या भागात वाढेल. मध्यंतरी राजस्थान सरकारने उभारलेल्या काही व्याघ्र प्रकल्पांना भेट दिली, त्या प्रकल्पांच्या धर्तीवरच या परिसरातही असे प्रकल्प सुरू करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. पर्यटन वाढल्यामुळे या भागात रोजगाराच्या संधीही निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आ. अमोल खताळ म्हणाले की, तालुक्यातील विविध विकासकामांसाठी महायुती सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधीची उपलब्धता होत आहे. या विकास प्रक्रियेला पालकमंत्री ना. विखे पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून, तालुक्यातील देवस्थानांच्या परिसर विकासासाठी निधी उपलब्ध होत असल्यामुळे तालुक्यातील तीर्थक्षेत्र पर्यटनाच्या कामाला चांगली गती मिळाली आहे. श्रीक्षेत्र निझर्णेश्वर देवस्थानचा परिसर भविष्यात विकास प्रक्रियेचे एक मुख्य केंद्र ठरेल, असे त्यांनी सांगितले.

# जमिनीच्या वादातून २१ वर्षीय पुतण्याचा बळी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**धाराशिव :** जिल्ह्यातील खामसवाडी परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. केवळ जमिनीच्या वादातून एका सख्ख्या चुलत्याने आपल्या २१ वर्षांच्या पुतण्याचा काटा काढला आहे. विलास शेळके असे आरोपी चुलत्याचे नाव असून त्याने सुजित शेळके या तरुण पुतण्यावर चाकूने वार करत त्याचे आयुष्य संपवले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विलास शेळके आणि मयत सुजित शेळके यांच्या कुटुंबात जमिनीच्या व्यवहारावरून मागील काही काळापासून वाद सुरू होता. या वादातून विलासच्या मनात पुतण्याबद्दल प्रचंड राग होता. रात्री साडेदहाच्या सुमारास हा राग अनावर झाला आणि एका भीषण घटनेत त्याचे रूपांतर झाले.

- **घटनेच्या रात्री सुजित हा आपल्या आजी-आजोबांसोबत झोपलेला होता. यावेळी आरोपी विलास तिथे आला आणि त्याने सुजितला उद्देशून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. शिवीगाळीचे रूपांतर वादात झाले आणि काही समजण्यापूर्वीच विलासने आपल्याकडे असलेल्या चाकूने सुजितच्या पोटावर सपासप वार केले.**

या भीषण हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या सुजितचा मृत्यू झाला. भररात्री घडलेल्या या प्रकारामुळे खामसवाडी गावात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी मृत सुजित शेळके याच्या आईने दिलेल्या जवाबावरून शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सख्ख्या चुलत्यानेच जमिनीच्या हव्यासापोटी पुतण्याचा काटा काढल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

शिराढोण पोलिसांनी या प्रकरणी वेगाने तपास सुरू केला असून आरोपीला जेरबंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची आज राहुरीत कर्डिलेंसाठी प्रचार सभा !

- **माजी मंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या सभेत व्यासपीठावर दिसणार !**
- **माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची मेळाव्यात राजकीय भूमिकेकडे सर्वांचेच लक्ष ?**

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**





**राहुरी :** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीचे मतदान जवळ आले असतानाच राहुरी मध्ये मोठा राजकीय द्विस्ट दिसत असून आज राहुरीत मुख्यमंत्री फडणवीस महायुती प्रणित भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्यासाठी प्रचारसभा घेत असून यामध्ये माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी मुख्यमंत्री यांच्या शब्दाला अनुसरून आपली उमेदवारी मागे घेतली व मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शब्दाला मान देऊन तठस्थ राहण्याचा निर्णय घेतला त्यांच्या या भूमिकेवर मुख्यमंत्री फडणवीस काय बोलणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

राहुरीची विधानसभा पोटनिवडणूकीची रणधुमाळी सुरू असून आमदारकीचे प्रबळ दावेदार व भाजपा उमेदवार अक्षय कर्डिले असून भाजपचे वरिष्ठ नेते राज्याचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण नामदार राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील, आणि विधान परिषदेचे उपसभापती प्रा . राम शिंदे यांनी राहुरीतील भाजप उमेदवाराच्या प्रचारासाठी हजेरी लावली असून आता कर्डिले यांच्यासाठी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह नामदार पंकजा मुंडे यांची सभा होत आहे.

आज सायंकाळी शहरातील नवी पेठ येथे भव्य प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे . राहुरीत अनेक प्रचार सभा गाजल्या . मात्र या पोटनिवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे नेते डॉक्टर प्रकाश आंबेडकर यांची राहुरीत एकमेव मोठी अशी प्रचार सभा शनिवार दिनांक १८ एप्रिल रोजी झाली . या सभेला चांगला प्रतिसाद मिळाला . या पाठोपाठ मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रचार सभा होत आहे .

या पोटनिवडणुकीच्या संदर्भाने माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्याच नावाची सध्या सर्वत्र चर्चा होत असल्याने आज तनपुरे यांची या पोटनिवडणुकीसाठी राजकीय भूमिका जाहीर होण्याची दाट शक्यता आहे. या दरम्यान मुख्यमंत्री फडणवीस राहुरीत नेमके काय बोलणार ? निवडणुकीतून माघार घेतलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्याबाबत काय सुतोवाच करणार त्यामुळे आज होणाऱ्या या सायंकाळच्या प्रचार सभेदरम्यान होणाऱ्या हालचालींना वेग आला आहे. मात्र प्राजक्त तनपुरे यांच्या राजकीय भूमिकेकडे राज्यासह नगर पाथर्डी राहुरी विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेत्यांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

## संसदेतील कविता, गर्दी आणि रणनीतीचा खेळ

लोकशाहीचे मंदिर मानल्या जाणाऱ्या संसदेत केवळ कायद्यांची निर्मिती होत नाही, तर तिथे मानवी भावनांचे, राजकीय डावपेचांचे आणि अभूतपूर्व गर्दीचे दर्शनही घडत असते. नुकत्याच पार पडलेल्या संसदेच्या सत्रात राजकीय गांभीर्यासोबतच जे हलके-फुलके क्षण पाहायला मिळाले, ते संसदीय इतिहासातील एक वेगळे पर्व अधोरेखित करतात. कवितांचे फुलोरे, घराघरातील संवादांचे संसदेत उमटलेले पडसाद आणि संसदेच्या आवारात भरलेली महिलांची 'जत्रा' यातून भारतीय लोकशाहीचे जिवंतपण पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

संसदेत होणारी भाषणे ही सहसा आकडेवारी आणि आरोपांनी भरलेली असतात. मात्र, यावेळेस खासदारांमधील सुप्त साहित्यिक जागी झालेला दिसला. केंद्रीय विधिमंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी आपल्या पत्नीवर पुस्तक लिहून आणि कविता सादर करून सभेचे लक्ष वेधून घेतले. त्यावर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी केलेली टिप्पणी अतिशय मजेशीर होती. ''मंत्री महोदय पत्नीवर पुस्तक लिहितात, कविता करतात, पण मला मात्र घरी पत्नीकडून ऐकून घ्यावे लागते,'' या त्यांच्या वाक्याने सभागृहातील तणाव निवळला. संसदीय कामकाजात अशा नर्मविनोदी क्षणांची गरज असते, कारण यामुळे संवादातील कडवटपणा कमी होण्यास मदत होते. मात्र, त्याच वेळी राहुल गांधींच्या दुखापतीकडे दुर्लक्ष करत त्यांच्या भाषणात आणले जाणारे अडथळे हे संसदीय शिष्टाचाराला कितपत धरून आहेत, हा प्रश्न उरतोच.

घटनेतील दुरुस्ती विधेयक मांडले जात असताना भाजपने ज्या पद्धतीने नियोजन केले, त्यावरून त्यांची संघटनशक्ती दिसून येते. प्रत्येक खासदाराने आपल्या मतदारसंघातील महिलांना मोठ्या संख्येने संसद पाहण्यासाठी आणले होते. संसदेच्या लॉबीमध्ये झालेली अभूतपूर्व गर्दी आणि कॅन्टीनमध्ये उडालेला गोंधळ हे चित्र संसदेत पहिल्यांदाच दिसत होते. डिजिटल व्यवहारांच्या नियमामुळे रोख रक्कम स्वीकारण्यास नकार देणारे कर्मचारी आणि भुकेले पाहुणे, हा विरोधाभास 'डिजिटल इंडिया'च्या प्रवासातील एक प्रॅक्टिकल अडचण दाखवून गेला. संसदेचे आवार फोटोसेशन आणि उत्साहाने भरून गेले होते, जे पाहता सभागृहाबाहेर एक जत्राच भरली होती की काय, असा भास होत होता.

राजकारणात 'हार' स्वीकारण्यापूर्वीच त्याची तयारी करणे हा चाणाक्यनीतीचा भाग असतो. घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होणार नाही, याची जाणीव सरकारला आधीच झाली होती, असे शुक्रवारी संसदेतील हालचालींवरून दिसून आले. सभागृहात विधेयक पडताच भाजपच्या महिला खासदारांनी मकरद्वारासमोर केलेले निदर्शन हे उत्स्फूर्त नव्हते, तर ते सकाळपासून रचलेल्या रणनीतीचा भाग होते. जेव्हा कायदेमंडळात संख्याबळ कमी पडते, तेव्हा रस्त्यावरील किंवा संसदेच्या आवारातील आंदोलनाद्वारे नरेटिव्ह सेट करण्याचा हा प्रयत्न राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरतो.

भविष्यात लोकसभेतील सदस्यांची संख्या ८५० पर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या संख्येवरून विद्यमान खासदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. प्रश्नोत्तराचा तास, चर्चेसाठी लागणारा वेळ आणि अधिवेशनाचा कालावधी यांचे गणित बसवणे हे भविष्यातील सभापतींसाठी मोठे आव्हान असेल. ८५० सदस्य जर तासनतास बोलू लागले, तर संसदेचे कामकाज केवळ वेळेअभावी कोलमडून पडेल की काय, अशी रास्त भीती वाटते. जरी ओम बिर्ला यांनी प्रत्येक नवीन खासदाराला संधी देण्याचे आश्वासन दिले असले, तरी 'वेळ' हाच भविष्यातील संसदेचा सर्वात मोठा शत्रू ठरणार आहे. संसदेतील हे सत्र म्हणजे केवळ वैधानिक चर्चा नव्हती, तर तो राजकीय कौशल्य, मानवी स्वभाव आणि भविष्यातील नियोजनाचा एक मिलाफ होता. कायद्याची चौकट राखताना लोकशाहीत जनसहभाग (गर्दीच्या रूपाने का असेना) वाढणे स्वागतार्ह आहे, मात्र संसदेची शिस्त आणि कामकाजाची वेळ यांचे योग्य संतुलन राखणे ही काळाची गरज आहे.

# यात्रेत गोंधळ घालणाऱ्यांची गय केली जाणार नाही : पो.नि. अरुण धनवडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान:**यात्रेत गोंधळ घालणाऱ्यांची गय केली जाणार नाही तसेच नवीन महिलांबाबत व इतर जातीय व धार्मिक वातावरण बिघडवणाऱ्या इसमाविरुद्ध तत्काळ गुन्हा दाखल होणार असून त्यांना जामीन होणे मुश्किल होणार असल्याने शांततेत यात्रा उत्सव पार पडावा असे आवाहन श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशनचे पो. निरीक्षक अरुण धनवडे यांनी केले.यात्रा कमिटी व ग्रामस्थांची यात्रा शांततेत पार पडावी यासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी धनवडे बोलत होते.



प्रारंभी राजेंद्र कोकणे यांनी दोन दिवस चालणाऱ्या यात्रोत्सव कार्यक्रम संदर्भात माहिती दिली. व पो.निरीक्षक धनवडे व त्यांचे सहाय्यक यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार केला.

यावेळी धनवडे बोलताना म्हणाले की सर्व देव देवतांनि,व महापुरुष यांनी मानवता व एकता व समतेचा संदेश जगाला दिला आहे.त्याचे पावित्र्य आपण राखावे.त्यांच्या विचारांना जगात मान आहे.तो मान, आदर आपण टिकून ठेवावा.लहान, मोठा हा भेद दूर ठेऊन आपण सर्वांनी एक म्हणून वावरावे.सर्वच धर्मांनी चांगली शिकवण दिली आहे. यात्रोत्सव काळात जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणे,विटंबन करणे व महिलांची छेड, छाड करणाऱ्यांची गय केली जाणार नाही त्यांच्यावर तत्काळ कारवाई होईल.तसेच ज्या गुन्हेगारावर तीन चार पेक्षा जास्त गुन्हे आहेत,सदर गुन्हेगार परत गुन्ह्यात सापडल्यास ते सुटणार नाहीत असा इशारा ही त्यांनी दिला.पालकांनी आपली मुले काय करतात,कोणाच्या संगतीत आहे याचि काळजी घ्यावी. तरुणावर काही गैर कृत्यामुळे गुन्हा नोंदवल्यावर त्यांचे करिअर धोक्यात येते त्यामुळे नवीन तरुणांनी विशेष काळजी घेण्याचे त्यांनी आवाहन केले. यात्रेच्या परिसरात दारू पिऊन हिंडणाऱ्यावर कडक कारवाई केली जाईल.त्याचप्रमाणे दोन्ही दिवस यात्रे साठी चांगला बंदोबस्त देणार असल्याचे त्यांनी सांगितले. तरी नागरिकांना काही समस्या किंवा तक्रार नोंदवायची असल्यास ११२ यावर कॉल करावा आपल्याला त्वरित पोलिस यंत्रणेची मदत मिळण्याची ग्वाही त्यांनी दिली.

या बैठकी प्रसंगी तंटामुक्तीचे आबासाहेब रणनवरे, ,अमोल पटारे, गजानन कोकणे, प्रा.कार्लस साठे,यशवंत रणनवरे,गोरक्ष कोकणे, विशाल पटारे,बापूसाहेब शिंदे,बंडोपंत बोडखे,मधुकर गायकवाड,संजय पटारे,बंडोपंत कोकणे, सुनिल बोडखे,काका डिके,उमेश त्रिभुवन,रामनाथ माळोदे, प्रा.जयकर मगर, भाऊसाहेब गव्हाणे, सुलताने,म्हस्के, बाबा सय्यद, पत्रकार आदी सह यात्रा कमिटी सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आज पासून श्री शंभू महादेवाचा यात्रौत्सव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभानसह परिसराचे ग्रामदैवत असलेल्या श्री महादेवाचा यात्रौत्सव सोमवार दिनांक २० एप्रिल व मंगळवार दिनांक २१ एप्रिल असा दोन दिवस साजरा होत असून या निमित्त विविध धार्मिक व मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. येथील मंदिर हे सुमारे सहाशे वर्षांपूर्वीचे असून श्री महादेव हे भक्तांना अद्भूत शक्ती देणारे असल्याचा अनेकांना प्रत्यय आलेला आहे. त्यामुळे परदेशातील शिवभक्तांनी या मंदिराला भेट दिलेली आहे. येथील श्री महादेवाचा यात्रौत्सव वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच अक्षय तृतीया झाल्यावर जो पहिला सोमवार येईल त्या सोमवारी यात्रौत्सव साजरा करण्याची परंपरा रुढ झालेली आहे.

यात्रोत्सवासाठी यात्रा कमिटी महिनाभर आधी यात्रोत्सवाच्या कामाला लागलेली असते. लोकवर्गणीतून हा संपूर्ण उत्सव साजरा होत असल्याने यात्रा कमिटी घरोघर फिरून यथाशक्ती लोकवर्गणी गोळा करून यात्रोत्सव दिमाखात पार पाडत असते. यात्रोत्सवा निमित्त मंदिराची रंगरंगोटी करण्यात आलेली असून परिसर स्वच्छ करण्यात आला आहे व मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. येथील श्री महादेव मंदिर पुरातन असून मंदिराचे बांधकाम संपूर्ण दगडी आहे. मंदिराच्या आतील व बाहेरील बाजूस सुंदर कोरीव नक्षीकाम केलेले आहे. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात भव्य अशी श्री महादेवाची पिंड आहे. मागील बाजूस पार्वतीची मूर्ती आहे. समोरच्या गाभाऱ्यात भव्य कासव व उजव्या सोंडेच्या गणपतीची भव्य मूर्ती आहे. याच गाभाऱ्यात श्री विष्णूंनी घेतलेल्या विविध अवतारांच्या सुंदर मूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिराचे प्रवेशद्वार हे पूर्व दिशेला असून पश्चिम दिशेलाही एक प्रवेशद्वार आहे. या मंदिराला 'मनोकामना पूर्ण करणारा महादेव' म्हणून ओळखले जाते. ग्रामस्थांनी व यात्रा कमिटीने भाविकांना दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# मानवी मूल्यांसाठी प्रबोधन हाच परिवर्तनाचा मार्ग : प्रा. सचिन झगडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शत्रू आणि मित्राची खरी ओळख पटणे म्हणजेच जागृतीची सुरुवात होय. समाजात अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आणि मानवी मूल्यांचे रक्षण करण्यासाठी प्रबोधन होणे ही आजच्या काळाची गरज आहे, असे स्पष्ट मत सत्यशोधक विचारवंत प्रा. सचिन झगडे यांनी व्यक्त केले.




श्रीरामपूर : महात्मा जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त महामानव विचार प्रबोधन समितीच्या सत्यशोधक प्रा. सचिन झगडे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

महामानव विचार प्रबोधन समितीच्या वतीने महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित जाहीर व्याख्यानात ते बोलत होते. श्रीरामपूर येथील सहर्षा हॉलमध्ये रविवारी हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

प्रा. झगडे म्हणाले, जागृतीमुळे माणसाच्या विचारांमध्ये आणि आचरणात बदल घडतो, आणि त्यातून समाजपरिवर्तन शक्य होते. कोणतीही राजकीय क्रांती यशस्वी व्हायची असेल, तर आधी सामाजिक क्रांती घडणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे आवाहन केले की, फुले-आंबेडकरांच्या विचारांचे आपण सुकाणू बनून हे कार्य 'मिशन' म्हणून पुढे नेले, तर प्रबोधनाचा दीप कायम प्रज्वलित राहील.

कार्यक्रमाचे उद्घाटन अपंग सामाजिक विकास संस्थेचे संस्थापक प्रा. संजय साळवे यांच्या हस्ते झाले. सुरुवातीला बाल व्याख्याती सांची मोहन हिने प्रभावी भाषणातून वातावरण भारावून टाकले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश मकासरे यांनी केले, तर सूत्रसंचालन राजेश हिवाळे यांनी केले. शेवटी ॲड. प्रज्ञा बागुल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# देडगावच्या पाच सुपुत्रांचा नागरी सत्कार सोहळा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर ग्रामीण भागातील तरुणही यशाची उंच शिखरे गाठू शकतात, याचे प्रत्यंतर देडगाव (ता. नेवासा) येथील पाच तरुणांनी दिले आहे. पोलीस दलात चार तरुणांची आणि रेल्वे विभागात एका तरुणाची निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

पोलीस दलात निवड झालेले ज्योती संतोष देवकाते, दादासाहेब गोरख देवकाते, ईश्वर अशोक काटकर आणि शंकर नवनाथ गोयकर तसेच रेल्वे विभागात लिपिकपदी निवड झालेल्या अभिमन्यू अर्जुन पुंड यांचा फेटा, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मिळविलेल्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणभूषण बाजीराव पाटील मुंगसे होते. प्रस्ताविकात चेअरमन सागर बनसोडे यांनी, शहरातील सोयीसुविधांचा अभाव असतानाही गावातील मुलांनी केवळ मेहनतीच्या बळावर सरकारी नोकरी मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. आज पाच जणांचा सन्मान होत असून, पुढील वर्षी हा आकडा दहापर्यंत जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी सरपंच चंद्रकांत मुंगसे, जिल्हा परिषद शिक्षक संजयकुमार लाड, युवा नेते निलेश कोकरे, सेल टॅक्स अधिकारी सोमेश्वर देवकाते आदींनी मनोगत व्यक्त करून यशस्वी तरुणांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना उमेदवारांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक तसेच अहिल्याबाई होळकर शाळा आणि कै. लक्ष्मण वांढेकर गुरुजी वाचनालय यांना दिले. सातत्य आणि आत्मविश्वास ठेवल्यास स्पर्धा परीक्षेत यश निश्चित मिळते, असा संदेश त्यांनी ग्रामीण तरुणांना दिला.

या सोहळ्यास पंचायत समितीचे माजी उपसभापती कारभारी चेडे, प्रगतशील शेतकरी बन्सी पाटील मुंगसे, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके, सोसायटीचे सचिव रामा तांबे, बालाजी देवस्थानचे विश्वस्त सुभाष मुंगसे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार युनूस पठाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन अशोक मुंगसे यांनी मानले.

# संतपुरुषाचा अपमान सहन केला जाणार नाही : अब्दुल शेख

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** देवगड देवस्थानचे पूज्यनिय गुरुवर्य भास्करगिरी बाबांविषयी वाचाळवीर विकास लवांडे याने केलेले बेजबाबदार, खालच्या पातळीचे आणि समाजात तेढ निर्माण करणारे विधान हे अत्यंत संतापजनक व निषेधार्ह असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे युवा नेते अब्दुल शेख यांनी म्हटले आहे. अशा प्रकारचे वक्तव्य करून लवांडे यांनी केवळ एका महान संतपुरुषाचा अपमान केलेला नाही, तर संपूर्ण समाजाच्या भावना दुखावण्याचे पाप केले असल्याचे ही त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

नेवासा तालुक्यातील माझ्या सर्व मुस्लिम बांधवांनी देखील ठिकठिकाणी निषेध नोंदवून सामाजिक ऐक्याची भक्कम परंपरा जपली आहे. आज सर्व धर्म, सर्व जाती आणि सर्व समाज एकत्र येऊन भास्करगिरी महाराजांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे, हे यावरून स्पष्ट झाले आहे. महाराजांविषयी असलेला आदर हा केवळ एका समाजापुरता मर्यादित नसून सर्व समाजाच्या हृदयात खोलवर रुजलेला आहे.



गुरुवर्य श्री भास्करगिरीबाबांनीआपल्या संपूर्ण आयुष्यात समाजप्रबोधन, व्यसनमुक्ती आणि संस्कारक्षम पिढी घडवण्याचे महान कार्य केले आहे. त्यांनी कधीही जाती-धर्मात फूट पाडणारे किंवा कोणत्याही समाजाला कमी लेखणारे वक्तव्य केलेले नाही. उलट, त्यांनी नेहमीच प्रेम, बंधुता आणि एकात्मतेचा संदेश दिला आहे. अशा निष्कलंक आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वावर आरोप करणे म्हणजे अज्ञानाचा कळस आहे.

विकास लवांडे यांने जाणीवपूर्वक खोटे आरोप करून समाजात विष पेरण्याचा प्रयत्न केला आहे. हे कृत्य मुळीच खपवून घेतले जाणार नाही. अशा विकृत मानसिकतेच्या व्यक्तीवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना तातडीने अटक करण्यात यावी, ही आमची ठाम आणि आक्रमक मागणी आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन आम्ही पत्राद्वारे गृहखात्याकडे अधिकृत तक्रार नोंदवली आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट)च्या वतीने राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करणार आहोत. दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही.आज जर अशा वक्तव्यांकडे दुर्लक्ष केले, तर उद्या समाजात अराजकता निर्माण होईल. त्यामुळे अशा प्रवृत्तीला आळा घालणे अत्यंत आवश्यक आहे. भास्करगिरी महाराजांसारख्या संतपुरुषाचा अपमान सहन केला जाणार नाही, हे आम्ही स्पष्ट शब्दांत सांगू इच्छितो.

अशा थोर आणि आदर्श व्यक्तिमत्त्वाचे नाव बदनाम करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे आहे त्याचा परिणाम करणाऱ्यावरच होणार आहे. त्यामुळे विकास लवांडे यांनी तत्काळ माफी मागावी, अन्यथा जनतेच्या रोषाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा गट) नेवासा विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आम्ही या घटनेचा तीव्र निषेध करत असून, न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच ठेवू. असा इशारा अब्दुलभैय्या शेख यांनी प्रसार माध्यमांशी बोलतांना दिला आहे.

# गलांडे विद्यालयात सायकल वितरण व स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव :** उंदीरगाव येथील रयत शिक्षण संस्थेचे भास्करराव गलांडे पाटील विद्यालय व ग्रामपंचायत उंदिरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक २० एप्रिल रोजी सकाळी ९ वा जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग ,महिला बालकल्याण विभाग व पंचायत समिती श्रीरामपूर यांच्या सेस फंडातून सायकल वितरण कार्यक्रम व एन एम एम एस स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना वह्या वाटप कार्यक्रम या विद्यालयात आयोजित करण्यात आला आहे मॅनेजिंग कौन्सिल सदस्या रयत शिक्षण संस्था मीनाताई जगधने या प्रमुख अतिथी व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे.या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रामसेवक ग्रामपंचायत उंदीरगाव,सरपंच उपसरपंच व सर्व सदस्य सर्व सेवक वर्ग शिक्षण प्रेमी व ग्रामस्थ उंदीरगाव ,तसेच मुख्याध्यापक ,सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी भा.ग.विद्यालय उंदीरगाव यांनी केले आहे

# सर्वच खात्यांच्या चेंबरमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची गरज : जाधव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा :** राज्यातील महसूल विभागातील भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्येक तहसीलदाराच्या चेंबरमध्ये सीसीटीव्ही बसवून ते जिल्हाधिकाऱ्यांच्या चेंबरशी जोडण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर, केवळ महसूल विभागापुरतेच मर्यादित न राहता सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे आदी सर्वच शासकीय खात्यांच्या चेंबरमध्ये सीसीटीव्ही बसविणे आवश्यक असल्याची मागणी मनसेचे राहाता तालुका अध्यक्ष गणेश जाधव यांनी केली आहे.

राज्यातील विविध सरकारी खात्यांमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढल्याचा आरोप करताना जाधव म्हणाले की, शिपायापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची साखळी तयार झाली आहे. कोणतेही शासकीय काम करायचे असल्यास 'कागदावर वजन' ठेवावे लागते, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. भ्रष्टाचार हा आता शिष्टाचार बनला असून, संबंधितांना त्याची भीती उरलेली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

यामुळे अनेक विभागांतील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांची संपत्ती जमा केल्याचा आरोपही त्यांनी केला. भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, प्रशासनात पारदर्शकता आणि जबाबदारी वाढविणे आवश्यक असल्याचे जाधव यांनी सांगितले. तसेच प्रत्येक सरकारी कर्मचाऱ्याच्या मालमत्तेचा वार्षिक गोपनीय अहवाल संकलित करण्याची सक्ती करावी, अशीही मागणी त्यांनी केली. या संपूर्ण प्रकरणात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालावे, असेही जाधव यांनी स्पष्ट केले.

# कष्टाच्या घामातून घडलेलं यश, सुजितची मुंबई हायकोर्टमध्ये दमदार झेप!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** आयुष्यातील प्रत्येक मोठं यश हे संघर्षाच्या पायावर उभं असतं, याचं जिवंत उदाहरण म्हणजे चि. सुजित याचा प्रवास होय. आमचे भाऊ श्री. भाऊ पाराजी वाघमारे व वहिनी सौ. नंदा वाघमारे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, मोलमजुरी करून, आपल्या मुलाचे शिक्षण पूर्ण केले. गरिबी, अडचणी आणि संकटांना न जुमानता त्यांनी आपल्या मुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी घेतलेली झुंज आज सार्थ ठरली आहे.

आज सुजितची मुंबई हायकोर्ट येथे डींशपे म्हणून नियुक्ती झाली, हा क्षण केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे तर संपूर्ण गावासाठी अभिमानाचा आहे. आई-वडिलांनी केलेल्या अथक परिश्रमाचे हे गोड फळ आहे. त्यांनी जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक मेहनतीच्या जोरावर मुलाला उंच भरारी घेण्यासाठी सक्षम केलं.

सुजितनेही आपल्या आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून अभ्यासात सातत्य ठेवले आणि आज या यशाने त्यांचा मान उंचावला आहे. त्याची ही यशोगाथा



अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरेल, याबद्दल शंका नाही. सुजितला पुढील वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा! त्याच्या हातून असेच यश संपादन होवो आणि तो आपल्या कुटुंबाचा व समाजाचा गौरव वाढवत राहो,

# भूमिपूजनाची हौस पूर्ण करण्यासाठी नागरीकांना दमबाजी : नगरसेवक कदम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी प्रतिनिधी :- कोपरगाव शहरातील सुभद्रानगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर, सभामंडप व परिसर सुशोभीकरण कामासाठी आमदार आशुतोष काळे यांनी निधी दिला असतांना भूमिपूजन आपल्याच हातून व्हावे यासाठी स्वत:ला युवा नेते म्हणवून घेणाऱ्या सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विवेक कोल्हे यांनी नागरीकांना दमबाजी केली असून यापुढेही असाच सत्तेचा उतमात सुरु राहिल्यास कोपरगावकर आणि स्वामी समर्थ भक्त त्यांना माफ करणार नाही अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक जनार्दन कदम यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केली आहे.

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नगरसेवक जनार्दन कदम यांनी पुढे म्हटले आहे की, आमदार आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहराचा मागील चाळीस वर्षापासूनचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवून कोपरगाव शहराच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी दिला आहे. त्याप्रमाणे श्री स्वामी समर्थ मंदिर, सभामंडप व परिसर सुशोभीकरण करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी जवळपास चाळीस लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे व कोपरगाव नगरपरीषदेच्या वतीने भूमिपूजन कार्यक्रम देखील ठरलेला होता. परंतु आमदार आशुतोष काळे यांनी दिलेल्या निधीतील कामाचे भूमिपूजन, उद्घाटन करून स्वत:च्याच हाताने स्वत:ची पाठ थोपटून घेण्याचा प्रकार



कोपरगाव नगरपरिषदेच्या सत्ताधारी गटाकडून सुरु असतांना यामध्ये आता त्यांचे नेते देखील मागे रहायला तयार नाहीत. रविवार (दि.१९) रोजी कोपरगाव शहरातील सुभद्रानगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर, सभामंडप व परिसर सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन करण्यासाठी काडीचेही योगदान नसतांना हे स्वयंघोषित युवा नेते विवेक कोल्हे भूमिपूजन करण्यासाठी आले होते. त्यावेळी ज्यांचे योगदान नाही त्यांच्या हस्ते कशाला भूमिपूजन करता अशी भूमिका घेवून नागरीकांनी या युवा स्वयंघोषित नेत्याला भूमिपूजन करण्यासाठी विरोध केला.

त्यावेळी आपली भूमिपूजनाची हौस पूर्ण होणार नसल्याचा राग विवेक कोल्हे यांना आल्यामुळे त्यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणीच नागरीकांना दमबाजी केल्याचा धक्कादायक प्रकार घडला असून त्यामुळे कोपरगावचे नागरीक व स्वामी समर्थ केंद्रातील भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कोपरगाव नगरपरिषदेची सत्ता मिळाल्यापासून सत्ताधाऱ्यांनाकडून नागरीकांना दमबाजी करण्याचे प्रकार वाढत चालले असून दमबाजी करण्यासाठी युवा नेते विवेक कोल्हे देखील मागे नाहीत. अशीच परिस्थिती यापुढेही सुरु राहिल्यास कोपरगावची जनता त्यांना योग्यवेळी योग्य धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही असे नगरसेवक जनार्दन कदम यांनी शेवटी म्हटले आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## राहुरीचा आठवडे बाजार गुरुवार ऐवजी शुक्रवारी

**राहुरी :** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने राहुरी शहरातील आठवडे बाजार मतदानाच्या दिवशी बंद ठेवण्यात येणार असून तो गुरुवार ऐवजी शुक्रवारी भरणार आहे. उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपूर विभाग यांच्या आदेशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. मतदानाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात नागरिकांची व वाहनांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे मतदान प्रक्रिया सुरळीत व सुरक्षितपणे पार पाडता येणार आहे. संबंधित आदेशावर अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करून तो अंमलात आणण्यात आला आहे. प्रशासनाने नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.



## पुण्यात भुईमूग सुधार प्रकल्पाची राष्ट्रीय बैठक;

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि भारतीय भुईमूग संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय कृषी महाविद्यालय, पुणे येथे २१ ते २३ एप्रिल २०२६ दरम्यान अखिल भारतीय समन्वित भुईमूग सुधार प्रकल्पाची वार्षिक बैठक आयोजित करण्यात आली आहे.या बैठकीचे उद्घाटन २१ एप्रिल रोजी होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू डॉ. विलास खर्चे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी भारतीय कृषि अनुसंधान परिषद चे उप-महासंचालक (पीक शास्त्र) डॉ. डी. के. यादव असतील. सन्माननीय अतिथी म्हणून डॉ. संजीव गुप्ता यांची उपस्थिती राहणार आहे.देशातील १९ राज्यांमधील १५० हून अधिक शास्त्रज्ञ या तीन दिवसीय बैठकीत सहभागी होणार आहेत. बैठकीत भुईमूग पिकावरील संशोधन सादरीकरण, विचारमंथन तसेच सुधारित वाण व शिफारशी जाहीर केल्या जाणार आहेत. या बैठकीतून आगामी संशोधनाची दिशा निश्चित होणार असल्याची माहिती आयोजन सचिव डॉ. प्रशांत बोडके व सहसचिव डॉ. दीपक दहाट यांनी दिली.

## नेवासा येथे ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सुरुवात २१ एप्रिलपासून



**नेवासा :** नेवासा बु. शिवारातील सुरेगाव रस्त्यावर स्थित सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमात अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन २१ ते २८ एप्रिल दरम्यान करण्यात आले आहे. मंगळवार, २१ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता ध्वजारोहण व धर्मध्वज पूजन करून सोहळ्याचा शुभारंभ संत-महंतांच्या हस्ते होणार आहे. सदगुरू ब्रह्मलीन नारायणगिरीजी महाराज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या सोहळ्याचे मार्गदर्शन आश्रमाचे प्रमुख महंत ह.भ.प. उद्धवजी महाराज मंडलिक (नेवासेकर) करीत आहेत. पंचक्रोशीतील भाविकांच्या सहकार्याने कार्यक्रम पार पडणार आहे. दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी स्तोत्रपठण व आरती, त्यानंतर ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी भोजनप्रसाद, सायंकाळी प्रवचन, हरिपाठ व रात्री हरिकीर्तन असा कार्यक्रमाचा दिनक्रम असणार आहे. या पारायण सोहळ्यात व कीर्तन महोत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन महंत उद्धव महाराज मंडलिक व भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुरस्काराची रक्कम शिक्षणासाठी अर्पण; डॉ. गिते यांची सामाजिक बांधिलकी

**झरेकाठी :** समाजहिताची जाणीव जपत शिक्षणाला हातभार लावण्याचा प्रेरणादायी उपक्रम पिंपरी लौकी अजमपुर येथील मूळ रहिवासी व सध्या पुण्यात वास्तव्यास असलेले डॉ. सोमनाथ वेणूताई निवृत्ती गिते यांनी राबविला आहे. महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार'ाची संपूर्ण रक्कम तसेच स्वतःकडून भर घालून त्यांनी एकूण ३२ हजार रुपये शैक्षणिक संस्थांना देणगी म्हणून अर्पण केली. या पुरस्काराची मूळ रक्कम १५ हजार रुपये असताना, त्यात स्वतःची रक्कम जोडून डॉ. गिते यांनी शिक्षण क्षेत्राला भक्कम आधार दिला. स्वर्गीय आई वेणूताई व वडील निवृत्ती भाऊराव गिते यांच्या स्मरणार्थ प्रवरा माध्यमिक विद्यालय, शिबलापूर येथे ११ हजार रुपयांची देणगी देण्यात आली. तसेच जिल्हा परिषद शाळा, शिबलापूर येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी २१ हजार रुपयांची देणगी जाहीर करण्यात आली. या वेळी प्राचार्य भारत दिवटे, सरपंच प्रमोद बोन्द्रे, माजी प्राचार्य आनंदाराव गिते, भिमराज बोन्द्रे, शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. गिते यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना निश्चितच मोठा लाभ होणार आहे.

# स्वच्छता अभियानातून प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालयाचा हरित संदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी येथे ग्रीन कॅम्पस क्लबच्या वतीने भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आला. अशी माहिती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे, मविश्वस्त माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, भाजपाचे उपाध्यक्ष डॉ. सुजय



विखे, मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, सचिव भारत घोगरे यांनी दिली.

या अभियानात सर्व विभाग प्रमुखांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयातील विविध विभाग, क्रीडांगण व संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वच्छतेचा संदेश दिला.

ग्रीन क्लबचे समन्वयक प्रशांत चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना ग्रीन क्लबची उद्दिष्टे समजावून सांगितली. पर्यावरण संरक्षण, प्लास्टिक मुक्त परिसर, जल व्यवस्थापन, वृक्षारोपण आणि शाश्वत विकास यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींवर विद्यार्थ्यांनी सजग राहावे असे आवाहन डॉ. गुल्हाने केले.

महाविद्यालयातील कॉम्प्युटर विभागातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग घेत ग्रीन क्लबच्या कार्याला हातभार लावला. परिसर स्वच्छ व हरित ठेवण्यासाठी ग्रीन कॅम्पस क्लबमार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविले जात असून, या स्वच्छता अभियानातून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

## हरिगाव चर्चगेट ग्रुपतर्फे डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** हरिगाव-उंदीरगाव येथील चर्चगेट ग्रुपच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती १६ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजमाम शेख तर कार्याध्यक्ष म्हणून दिनेश गायकवाड यांनी भूमिका बजावली. प्रमुख पाहुणे म्हणून अशोक सहकारी कारखान्याचे चेअरमन वीरेश पाटील गलांडे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, सलीम शेख, भीमा बागुल तसेच नगरसेवक नितीन शेजवळ उपस्थित होते. यावेळी संत तेरेजा चर्चचे धर्मगुरू फ्रान्सिस ओहोळ, बौद्धाचार्य गौतम पगारे, बीडीओ सुभाष मस्के, विविध ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. यासाठी दीपक गोडगे, सिद्धार्थ बागुल व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला व पुरुष भीमसैनिक उपस्थित राहून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



# कोपरगाव तालुक्यातील रस्ते निकृष्ट दर्जाचे; चौकशीची मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेली रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय गोविंदराव शिंदे यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी अधीक्षक अभियंत्यांना निवेदन देत सखोल चौकशीची मागणी केली आहे. प्रसिद्धीपत्रकानुसार, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सांगळे व युवा जिल्हाध्यक्ष पांडुरंग औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या पाहणीत अनेक गंभीर त्रुटी आढळल्या. रस्त्यांमध्ये डांबर व खडीचे प्रमाण कमी वापरण्यात आले असून जाडी व रुंदी निकषांपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले. अनेक ठिकाणी रस्त्यांवर खड्डे पडले असून पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था अपुरी असल्याचेही समोर आले.या प्रकरणी संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, कामांची गुणवत्ता तपासणी (क्वालिटी कंट्रोल) करून अहवाल जाहीर करावा तसेच दोषींना दिली जाणारी बिले तात्काळ थांबवावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास बेमुदत उपोषण छेडण्याचा इशाराही शिंदे यांनी दिला आहे.

## रेल्वे अतिक्रमणप्रकरणी नागरिकांनी घेतली खासदारांशी भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रेल्वे परिसरातील अतिक्रमण हटविण्याबाबत रेल्वे विभागाकडून नोटिसा देण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिक व दुकानदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन बडदे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांनी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांची भेट घेतली.

भेटीदरम्यान नागरिकांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, अतिक्रमण हटवल्यास त्यांचा उदरनिर्वाह धोक्यात येईल, कारण त्यांच्याकडे अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही. तसेच काही स्थानिक लोकप्रतिनिधींवर दुहेरी



भूमिका घेत असल्याचा आरोपही नागरिकांनी यावेळी केला.

यावेळी सचिन बडदे यांनी विविध मुद्दे खासदारांच्या निदर्शनास आणून दिले. सर्व बाबी ऐकून घेतल्यानंतर खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी नागरिकांना ठाम पाठिंबा देत लवकरच पुणे येथील संबंधित विभागीय कार्यालयाशी बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. या भेटीत विकास डेंगळे, अभिजीत मोरे, मुबारक भाई, मेहबूब भाई, शुभम लोळगे, भागवत घुगे, गणेश भडांगे, युवराज घोरपडे, निलेश घोरपडे, सोमनाथ पवार, सुभाष भडांगे, योगेश वाकचौरे, वैभव शिरसाट यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

## ना.विखे पाटील यांच्या निधीतून हरेगावचा विकास करू : पटारे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव :** - पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे हे अनेक विकास कामे पूर्ण करीत असून हरेगावचा विकास देखील त्यांच्या निधीतून गावचे सरपंच दिलीप त्रिभुवन यांच्या माध्यमातून करू असे प्रतिपादन पंचायत समितीचे माजी सभापती दीपक पटारे यांनी जॉगिंग ट्रॅक शुभारंभ प्रसंगी केले.

ना. विखे पाटील यांच्या निधीतून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात पेव्हिंग ब्लॉक चे जॉगिंग ट्रॅक व ब्राह्मणगाव फाटा ते शिव मारुती मंदिर स्ट्रीट लाईट कामाचा शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार लहुजी कानडे हे होते.



यावेळी बाजार समिती चे संचालक गिरीधर आसने, डॉ. शंकरराव मुठे, भाऊसाहेब बांद्रे,अशीभाई पोपटीया, सरपंच दिलीप त्रिभुवन, ग्रामपंचायत सदस्य रमेश भालेराव, दीपक नवगिरे, अशोक बोधक, काशिनाथ जगताप, आर के गोरे, गुलाबराव पठारे, भाऊसाहेब व्हसाले, मिलिंद मोरे, सुनील ओहोळ, नानाभाऊ काटे, संजय भनगडे, हरीश मढीकर, अशोक शरणागते , आशिष शिंदे, राजेंद्र देशमुख, अलेक्झ दुशिंग, आदी सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सुनील पवार यांनी आभार मानले.

# लव्ह जिहाद विरोधात हिंदू समाजाने एकत्र यावे : हर्षा ठाकूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** लव्हजिहाद.लँडजिहाद पाठोपाठ आता कॉर्पोरेट जिहाद सारखा प्रकार नुकताच उघडकीस आला आहे.लँड जिहादच्या नसवाखाली तुमच्या जमिनी गिळंकृत केल्या जात आहे त्यामुळे या वेगवेगळ्या प्रकारे षडयंत्र रचून तुमच्याच आया बहिणींना खोट्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून फसविण्याचे प्रकार सुरू आहे ते हाणून पाडण्यासाठी सर्व हिंदू धर्म समाज बांधवांनी एकत्र यावे असे आवाहन नांदेड येथील हिंदुत्ववादी व्याख्यात्या हर्षा ठाकूर यांनी केले

संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथे आयोजित करण्यात आलेल्या हिंदू महासंमेलनामध्ये मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या यावेळी व्यासपीठावर आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ जुन्नर येथील हिंदुत्ववादी वक्ते सुनील काळे ,अयोध्या येथील राजश्री महंत एकनाथ महाराज यांच्यासह अनेक हिंदुत्ववादी कार्यकर्ते उपस्थित होते. हिंदूमहासंमेलनानिमित्तहिवरगाव पावसा फाट्यापासून ते गावापर्यंत वाजत गाजत शोभायात्रा काढण्यात आली होती.



ठाकूर म्हणाल्या की जिहादी आता वेगवेगळ्या क्षेत्रात आपले पाय रोवत आहे त्यांचे अनेक व्यवसायात दुकाने आहेत या व्यवसायाच्या माध्यमातून ते आपल्या मुलींना विविध आमिषे दाखवून खोट्या प्रेमाच्या जाळ्यात ओढत लव्ह जिहादच्या माध्यमातून मुलीचे अश्लील व्हिडिओ काढून फसविले जात आह आहे त्यामुळे हिंदू समाज बांधवांनी जागृत होऊन या जिहादीच्या विरोधात पेटून उठले पाहिजे त्यांच्या दुकानात खरेदी न करता हिंदू धर्मीयांच्या दुकानातच वस्तू खरेदी करावयात असा सल्ला देत त्या म्हणाल्या की.आत्तापर्यंत १८० च्या वरती हिंदू मुली लव्ह जिहादच्या माध्यमातून फसविल्या आहेत हा लव्ह जिहाद म्हणजे हिंदू धर्माला लागलेली कीड आहे .जिथे तुम्ही जातिवादमध्ये विखरला गेलेला आहात इथे तुम्हाला धर्म पाहूनकाटले जात आहे नुकताच पहलगा हल्ल्यात जिहादी अतिरेक्यांन तुमचा हिंदू धर्म विचारून गोळ्या घालून मारले आहे आपला हिंदू धर्म टिकला पाहिजे यासाठी अनेक महापुरुषांनी प्राणाचे बलिदान दिले परंतु आपण जर हिंदू धर्म एखाद्याला विकात असेल तर त्याची आपल्याला शरम वाटली पाहिजे. आपला धर्म स्वीकारला नाही तर आपल्या आया बहिणींना विवस्त्र करून त्यांची सोशल मीडियाच्या माध्यमातून बदनामी करत आहे त्यांना त्यांची जागा दाखवण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे.हिंदू धर्माच्या मुलींना जिहादी समोर नाचणाऱ्या नागिन न बनवता छत्रपती शिवबांच्या वाघीण बनवा आता हा छपरीपणा सोडून द्या आणि आपल्या हिंदू धर्माच्या मुलींना धर्म संस्कार आणि संस्कृती शिकवा असा सल्ला आशा ठाकूर यांनी हिंदू समाज बांधवांना दिला. हिंदू संमेलन घेण्यामागील भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघटक अक्षय थोरात यांनी स्पष्ट केली, तर आभार भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष काशिनाथ पावसे यांनी मानले. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शुभम उपाध्याय यांच्या 'वंदे मातरम गीताने संमेलनाची सांगता झाली.

काही गुणदोषांमुळेच आपण हजारो वर्षे गुलामगिरीत राहिलो. त्यामुळे आता दोषमुक्त हिंदू समाज निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी पूर्वजांचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. इतिहासाचा अभ्यास केला नाही तर भविष्य व वर्तमान डळमळीत होऊ शकते. त्यासाठी इतिहासाचे पुनर्लेखन, समाज जागरूकता व स्वाभिमान यावर भर देणे गरजेचे आहे. हिंदू धर्मात मूळतः कधीच जातीय तेढ नव्हता, परंतु काहींनी जातीय तेढ निर्माण करून देशाचे विभाजन करण्यासाठी एक षड्यंत्र रचले जात आहे. हे षड्यंत्र मोडून काढण्यासाठी सर्व हिंदूंनी एकत्र येणे गरजेचे आहे.

श्री सुनील काळे
हिंदुत्ववादी वक्ते जुन्नर

संगमनेर तालुक्यात प्रथमच हिंदू संमेलन झाले या हिंदू संमेलनासाठी हिवरगाव पावसा, चंदनापुरी, आनंद वाडी, झोळे, गणेशवाडी, रायतेवाडी, खांडगाव, सावरगाव तळ, शिरापूर, निमगाव टेंभी, देवगाव, जाखुरी, संगमनेर खुर्द या गावांतील हिंदू समाज बांधवांनी हजेरी लावत हिंदुत्वाची ज्योत पेटवत ठेवली

# भाजपला मतदान म्हणजे कुटुंबाचे वाटोळे करणे : ॲड. प्रकाश आंबेडकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी संतोष चोळके यांच्या प्रचारार्थ घेतलेल्या सभेत केंद्र सरकार, भाजप आणि विद्यमान राजकीय परिस्थितीवर जोरदार टीका केली. आज विरोधी पक्षाचा खरा आवाज फक्त वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातूनच सुरू आहे. इतर सर्व राजकीय पक्ष ईडीच्या दबावामुळे गप्प बसले आहेत, त्यामुळे ते भाजपविरोधात लढू शकत नाहीत, असा घणाघात त्यांनी केला.

ॲड. आंबेड कर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिकेसोबतच्या व्यापारी करारावरही प्रश्न उपस्थित केले. या करारामुळे अमेरिकेतील शेतीमाल भारतात कमी दरात येईल, असे सांगत त्यांनी उदाहरण दिले की,





ब्राझीलमधील साखर ३० रुपये किलो तर भारतात ४० रुपये किलो आहे. त्यामुळे व्यापारी स्वस्त साखरेकडे वळतील आणि स्थानिक शेतकरी संकटात सापडतील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली भाजपवर निशाणा साधताना त्यांनी भोंदू अशोक खरातचा उल्लेख करत, अशोक खरातसारख्या भोंदूला भाजप आणि त्यांच्या मंत्र्यांनी पुढे केले आणि आता त्यालाच वाचवत आहेत. भाजपला मतदान म्हणजे देशाचे आणि कुटुंबाचे वाटोळे करणे, असा घणाघात केला.

यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी शहीद सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणावरही सरकारवर जोरदार टीका केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात या प्रकरणाबाबत खोटे विधान केले, मात्र त्याविरोधात एकाही आमदाराने आवाज उठवला नाही.

सभागृहातील रेकॉर्ड भविष्यात अधिकृत नोंद म्हणून कायम राहणार असताना सत्य मांडण्याचे धाडस कोणीच दाखवले नाही, असे ते म्हणाले. राज्य सरकार ही केस दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत, आम्ही ही केस दाबू देणार नाही. २७ आरोपी पोलिसांना शिक्षा झाल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

सभेला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य दिशा शेख, प्रा. किसन चव्हाण, ॲड. अरुण जाधव, तय्यब जफर, जितरत्न पटाईत अनिल जाधव योगेश साठे मधुकर साळवे, अजीज व्होरा, बाळासाहेब जाधव, अमजद पठाण, पिंटू साळवे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अक्षय तृतीयेच्या दिवशी पेन्शनधारकांची गैरसोय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** पंचायत समिती संगमनेर आणि अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक लि. शहर शाखेच्या गलथान कारभारा मुळे ऐन अक्षय तृतीया या अत्यंत महत्त्वाच्या सणाच्या शुभ मुहूर्तावर पेन्शनधारकांना दिलासा मिळण्या ऐवजी त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागल्याची धक्का दायक बाब संगमनेरमध्ये समोर आली आहे. त्यामुळे पेन्शनधारकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. मार्च महिन्याची पेन्शन एप्रिलमध्ये देण्यासाठी जिल्हा परिषद अहिल्या नगरकडून आवश्यक अनुदान वर्ग करण्यात आले होते. त्यानुसार दि. १८ एप्रिल २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या शहर व तालु क्यातील शाखांमधून पेन्शन घेणाऱ्या निवृत्त कर्मचाऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आली होती. मात्र, संगमनेर शहर व तालुक्यातील जे पेन्शनधारक राष्ट्रीयकृत बँकांमधून पेन्शन घेतात, त्यांच्या खात्यात ही रक्कम वेळेत वर्ग करण्यात आली नाही. त्यामुळे पेन्शनधारकांना अक्षय तृतीयेच्या दिवशीही पेन्शनपासून वंचित राहावे लागले. याबाबत नेमकी चूक कुठे झाली, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेकडून रक्कम राष्ट्रीयकृत बँकांकडे वर्ग करण्यात अडचण आली की पंचायत समिती कडून आवश्यक माहिती वेळेत पाठवली गेली नाही, हा तपासाचा विषय असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, प्रमोद कुलट यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, पंचायत समिती संगमनेर व जिल्हा सहकारी बँक यांनी अक्षय तृतीयेच्या निमित्ताने पेन्शन धारकांना उपाशी राहिले आहे. या प्रकारामुळे पेन्शन धारकांमध्ये संतापाची लाट उसळली असून संबंधित प्रशासनाने तात्काळ याची दखल घेऊन उर्वरित पेन्शन धारकांच्या खात्यात रक्कम वर्ग करावी, अशी मागणी होत आहे.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)**

**E-TENDER NOTICE NO (2026_DOAWB_1295747_1)**

***Construction Of Onion Storage Shed 900 MT***

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. ***Bhagwatimata Farmer Producer Company Limited, at post Nimgaon Jali, Tq. Sangamner, District-Ahilyanagar*** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned works. The estimated cost of work is **Rs.91.40 lakhs (Including GST).** The last date for submission of online bid is **21/05/2026 up to 02.00PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project Dist.Ahilyanagar.**

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)**

**E-TENDER NOTICE NO: 2026_DOAWB_1295750_1**

***(Construction Of Onion Storage Shed 1000 MT )***

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Kalbhairavnath Farmer Producer Company Limited, Akhatwadi, Tq.Shevgaon, Dist.Ahilyanagar** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned works. The estimated cost of work is **Rs.105 lakhs (Including GST).** The last date for submission of online bid is **21/05/2026 up to 2:00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project Dist. Ahilyanagar.**

## पान १ वरुन

## नेवासा नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांवर गोळीबार !

कार्यालयात चर्चा सुरू असताना संजय सुखदान तेथे येऊन शिवीगाळ करत, तू बाहेर ये, आज तुला बघतोच, अशी धमकी दिली. त्यानंतर आपण कार्यालयीन कामकाज आटोपून अहिल्यानगरकडे निघालो असताना संजय सुखदान याने त्याच्या बुलेट मोटरसायकलने आपल्या चारचाकी वाहनास धडक दिली. त्यानंतर पुढे खोलेश्वर मंदिर चौकाजवळ वाहन आडवे लावून गावठी कट्ट्यातून आपल्या दिशेने गोळीबार केला. आपण खाली वाकल्याने गोळी चुकली. दुसरी गोळी झाडताना गावठी कट्ट्याचा ट्रिगर अडकल्याने आपण बचावलो.
आपण घाबरलो असल्याने तत्काळ तक्रार दाखल केली नाही, मात्र आरोपी संजय सुखदान याचे काही साथीदार पाठलाग करत असल्याचे लक्षात आल्याने फिर्याद दिली असेही नमूद केले आहे.

# अवैध धंदे बंद करा, अन्यथा आंदोलन : नगराध्यक्ष संजय जाधव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गंगापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोकाळलेल्या अवैध धंद्यांना पोलीसांच्या आर्थिक देवाण-घेवाणी'मुळेच हे अड्डे राजरोस सुरू असुन सुरू असलेले अवैध आठ दिवसांत बंद करण्यात यावे अन्यथा गंगापूर शहर बंद पुकारुन लोकशाही मार्गाने आंदोलन करणार असल्याचा इशारा लोकनियुक्त नगराध्यक्ष संजय जाधव यांनी निवेदनात दिला आहे.

गंगापूर येथील उपविभागीय पोलिस अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की गंगापूर शहर व परिसरातील अत्यंत भयावह आणि संतापजनक परिस्थिती निर्माण झाली असून गंगापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही महिन्यांपासून कायद्याचा धाक पूर्णपणे संपुष्टात आला असून

अवैध धंद्यांनी सर्वसामान्य नागरिकांचे जगणे कठीण केले आहे. गुटखा तस्करी व विक्री शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा शहरात, विशेषतः राजीव गांधी चौक आणि मन्सुरी कॉलनी या भागात मोठ्या अड्ड्यांवरून सर्रास विकला जात आहे. पोलीस प्रशासनाशी असलेल्या संशयास्पद आर्थिक 'देवाण-घेवाणी'मुळेच हे अड्डे राजरोस सुरू आहे. अवैध दारू व मटका शहर आणि ग्रामीण भागात देशी-विदेशी दारूचे अवैध साठे व विक्री केंद्रे फोफावली आहे

कायगाव सारख्या पवित्र धार्मिक स्थळी, जिथे लोक अंत्यविधी व धार्मिक कार्यासाठी येतात, तिथे एका पोलिसाच्या नातेवाईकाकडूनच खुलेआम दारू विक्री,गुटखा विक्री, पत्त्याचे क्लब असे विविध अवैध धंदे केले जात आहे. एव्हढेच नव्हे तर गंगापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत छत्रपती संभाजीनगर- अहिल्यानगर मार्गावरील एका हॉटेलमध्ये प्रशासनातील एका विभागाचे अधिकारी कर्मचारी यांच्यात उघडपणे सुरू असलेल्या सेक्स रॅकेटवर कारवाई करण्याऐवजी, पोलीस निरीक्षकांनी अर्थपूर्ण तडजोड करून हे प्रकरण दाबल्याची चर्चा सर्वत्र असल्याचा आरोप करण्यात आला आहे

**पोलिसांच्या प्रतिमेचे निघाले धिंडवडे**

पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांची कार्यशैली अत्यंत संशयास्पद आणि निष्क्रिय आहे. त्यांच्या 'आशीर्वादाने' मटका, जुगार आणि अवैध धंदे फोफावले असून,सर्वसामान्य जनता पोलीस ठाण्याकडे आशेने पाहण्याऐवजी संतापाने पाहत आहे.गंगापूर शहराची शांतता आणि सुव्यवस्था राखण्यात स्थानिक पोलीस पूर्णपणे अपयशी ठरले असून येत्या ८ दिवसांत या सर्व बेकायदेशीर धंद्यांना कायमचा आळा न बसल्यास 'गंगापूर बंद' पुकारून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नगराध्यक्ष संजय जाधव यांनी निवेदनाद्रे दिला आहे. निवेदनावर जाधव यांची स्वाक्षरी आहेत.

## श्रीरामपूरात मानव एकता दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर व सत्संग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर:** मानवतेत प्रेम, करुणा आणि बंधुभावाची भावना वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने संत निरंकारी मिशनच्या वतीने २४ एप्रिल रोजी मानव एकता दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. बाबा गुरुबचन सिंह जी व चाचा प्रताप सिंह जी यांच्या पवित्र स्मृतीनिमित्त हा उपक्रम राबविण्यात येत असून त्यांच्या त्याग, समर्पण आणि निस्वार्थ सेवेच्या आदर्शाचे स्मरण करण्यात येणार आहे.

दिल्ली येथे सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन उपस्थितीत मुख्य कार्यक्रम पार पडणार असल्याची माहिती मिशनचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी दिली. संत निरंकारी मिशन गेल्या चार दशकांपासून रक्तदान क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असून मुंबई येथील त्यांच्या ब्लड बँकेमार्फत अनेकांना जीवदान मिळाले आहे.

मानव एकता दिनानिमित्त देशभरातील निरंकारी भवनांमध्ये रक्तदान शिबिरे व सत्संगाचे आयोजन करण्यात येते. त्याच अनुषंगाने श्रीरामपूर येथील नॉर्दन ब्रांच निरंकारी भवनात शुक्रवार, २४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तसेच सकाळी ११ ते १ या वेळेत सत्संग सोहळाही होणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन डॉ. दिलीप शिरसाठ यांच्या हस्ते होणार असून ज्ञान प्रचारक श्रीधरजी पाटील (मुंबई-ठाणे) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरही या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करून मानवतेच्या या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन निरंकारी ज्ञान प्रचारक राजकुमार माटा यांनी केले आहे.

## श्रीरामपूरमध्ये हिंदूविरोधी विकास लवांडेचा निषेध..!

**श्रीरामपूर, :** दोन दिवसापूर्वी हिंदूविरोधी शरद पवार गटाच्या विकास लवांडे याने पत्रकार परिषद घेत हिंदू धर्मातील महंताविषयी चुकीचे भाष्य केले. चुकीचे भाष्य करणाऱ्या लवांडेचा याच्या विरोधात श्रीरामपूर येथील श्रीराम मंदिर चौक येथे वारकरी संप्रदाय आणि सर्व हिंदुत्ववादी संघटनांनी एकत्र येऊन निषेध व्यक्त करत कठोर कारवाई करावी अशी मागणी करत पोलिस प्रशासनास निवेदन देण्यात आले आहे. लवांडे यांनी ज्या संताविषयी चुकीचे भाष्य केले त्यात अयोध्या श्रीराममंदिर (राष्ट्र मंदिर) याचे कोषाध्यक्ष गोविंददेवगिरी महाराज, सरला बेटाचे मठाधिपती धर्मरक्षक रामगिरी महाराज, देवगड संस्थानचे भास्करगिरी महाराज व इतर महाराज यांचा समावेश आहे. ज्या वारकरी संप्रदायातील महंतानी आपल्या जीवनावर तुळशीपत्र ठेवले आणि या हिंदू धर्माच्या कार्यात वाहून घेतले यांच्या विषयी चुकीचे भाष्य करणे हा गुन्हा आहे. वारकरी संप्रदाय शांत दिसत असला तरी आम्ही जशाच तसे उत्तर देण्याची क्षमता ठेवतो, असेही त्यांनी सांगितले.यावेळी श्रीरामपूर तालुक्यातील महाराज, हिंदुत्ववादी संघटनेतील कार्यकर्ते उपस्थित होते.



## समता इंटरनॅशनल स्कूलचा विक्रमी निकाल
### ९२% विद्यार्थ्यांना ७०% पेक्षा अधिक गुण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** समता इंटरनॅशनल स्कूलने सलग दहाव्या वर्षी उल्लेखनीय यशाची परंपरा कायम राखत शैक्षणिक क्षेत्रात नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सीबीएसई इयत्ता १० वी परीक्षेत शाळेच्या ९२ टक्के विद्यार्थ्यांनी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले, तर तब्बल ५० टक्के विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली.

या यशामागे शाळेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. स्वाती संदीप कोयटे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, प्राचार्य समीर अत्तार यांचे प्रभावी नियोजन तसेच शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर दिलेला भर आणि अभ्यासातील शिस्त यामुळेच हा उज्ज्वल निकाल शक्य झाल्याचे मत व्यक्त होत आहे.

संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा (काका) कोयटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, हा निकाल केवळ गुणांचा नसून विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रम, शिस्त आणि जिद्दीचे प्रतीक आहे. भविष्यातही उत्कृष्टतेचा हा प्रवास कायम ठेवण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे.

**गुणवंत विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी**

आर्या दीपिका राहुल सांड हिने ९९ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. राजेश्वरी सुरेखा चैतन्य तांबे हिने ९८ टक्के गुणांसह द्वितीय स्थान मिळवले असून सामाजिक शास्त्र विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले. दृष्टी पुनम खुशाल ठाकूर हिने ९७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. तसेच माहिती तंत्रज्ञान (खढ) विषयात ११ विद्यार्थ्यांनी शंभर टक्के गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळवले. या यशाबद्दल सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला असून परिसरातही या निकालाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पाईपलाईन फुटल्याने पाणीपुरवठा विस्कळीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** नगर मनमाड राज्यमार्गाच्या साईड गटाराचे काम सुरू असताना येथील पाणीपुरवठा टाकी जवळील दहा इंची पाईपलाईन पोकलेन ने फुटल्यामुळे कोल्हार-बेलापूर रोडवर असलेल्या शिवाजीनगर या उपनगरात रविवारी पाणीपुरवठा होऊ शकला नाही.

गेल्या रविवारी म्हणजे आठ दिवसांपूर्वी शिवाजीनगर उपनगरात पाणीपुरवठा करण्यात आला होता. काल रविवारी सकाळी पाणीपुरवठा होणे अपेक्षित होते परंतु पाईपलाईन फुटल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला त्यामुळे शिवाजीनगर उपनगरातील नागरिकांना पाण्यासाठी भर उन्हात वन वन करावी लागली.

गेले महिनाभरात कोल्हार भगवतीपुर गावातील पाणीपुरवठा कधी वीजपुरवठा खंडित असल्यामुळे तर कधी पाईपलाईन फुटल्यामुळे तर कधी तळ्यातील पाणी संपल्यामुळे विस्कळीत होत आहे त्यामुळे कोल्हार भगवतीपुर नागरिकांची अवस्था धरण उशाला कोरड घशाला अशीच होत आहे. कोल्हार बुद्रुक व भगवतीपुर ग्रामपंचायत उन्हाळ्यातही पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करीत असले तरी वीज पुरवठा खंडित होणे पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटणे या ना त्या कारणाने अनेक वेळा कोल्हार भगवतीपुर चा पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याने कोल्हार भगवतीपुरच्या पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक कोलमडले आहे. काल रविवारी दिवसभर पाईपलाईन दुरुस्तीचे काम पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांकडून सुरू होते. त्यांनी अथक परिश्रम घेऊन पाईपलाईन दुरुस्तीचे काम केले त्यामुळे सोमवारी शिवाजीनगर उपनगरात पाणीपुरवठा होईल असे सांगण्यात आले.

वीज पुरवठा खंडित होणे व पाईपलाईन फुटणे या कारणामुळेच फक्त पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे असे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात आले. कोल्हार बुद्रुक ग्रामपंचायत कडून नेहमीच सुरळीतपणे पाणीपुरवठा व्हावा यासाठी नेहमीच काळजी घेतली जाते.

## श्रीरामपुरात तलवार दांड्याने मारहाण

श्रीरामपूर, : श्रीरामपूर शहरातील मिल्लतनगर, वॉर्ड नं. १ येथे फर्निचर दुकानदाराच्या डोक्याला तलवार लावून लाकडी दांड्याने मारहाण करत जखमी केले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील मिल्लतनगर, वॉर्ड नं. १ येथे राहणारे फर्निचर व्यावसायिक राजमहंमद महेबूब शहा (वय-५०), हे राहाता येथे पत्नीच्या उपचारासाठी गेले असता त्यांच्या मुलीचा फोन आला की, तीन जण घरी आले असून तुमचा नंबर मागत आहेत, त्यांच्या हातात तलवारीसारखे हत्यार असून लाकडी दांडके आहे. तेव्हा राजमहंमद महेबूब शहा ताबडतोब श्रीरामपूरला घरी आले असता या तिघांनी त्यांना शिवीगाळ सुरू केली व एकाने डोक्याला तलवारसारखे हत्यार लावून डोक्यात लाकडी दांड्याने मारून जखमी केले.

याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात राजमहंमद महेबूब शहा यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अंजीम अन्वर पठाण, नाजीम अन्वर पठाण व एक अनोळखी इसम यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

## खोटे बोलून आरोप करणारे भोंदू वसुली एजंट जनतेने ओळखले : कलविंदर दडीयाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** खोटे बोलून आरोप करणाऱ्या आणि जनतेची दिशाभूल करणाऱ्या भोंदूशी छुपी समता साधणाऱ्या वसुली एजंटला आता नागरिकांनी ओळखले असल्याची जबरी टीका कलविंदर दडीयाल यांनी केली आहे.धार्मिक आणि पवित्र ठिकाणीही राजकीय गोंधळ निर्माण करण्यासाठी स्वतःचे लोक पुढे करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला जातो, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.उलट खोट्या अफवाखोरांचा दुटप्पी चेहरा आणि खोटेपणा काय आहे त्यांचे हात कशात काळे झालेले आहेत हे लवकरच अनेक पुराव्यानिशी उघड पाडणार असल्याचे दडीयाल यांनी जाहीर केले आहे. विरोधकांच्या खोट्या भूमिकांना विरोध करणे याचा अर्थ कुणालाही दमबाजी झाली नसून आमच्या नेत्यांनी आम्हाला रोकण्याचे काम केले.विरोधकांचे उलटा चोर कोतवाल को दाटे अशी भूमिका विरोधकांची आहे असे खडेबोल देखील सुनावले आहे तसेच विरोधकांनी पातळी सोडून राजकारण करू नये अन्यथा त्यांचा खरा चेहरा जनतेसमोर आल्यास तोंड दाखवण्यास जागा उरणार नाही याचे भान ठेवावे असा इशारा देखील दिला आहे.



दडीयाल म्हणाले की, विरोधकांनी धार्मिक ठिकाणी प्रथम गोंधळ घालायचा आणि नंतर त्यातून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करायचा, हा काही जणांचा ठरलेला डाव आहे. अशा प्रकारे अर्धसत्य आणि चुकीची माहिती पसरवून जनतेमध्ये काळे संभ्रम निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जात आहे. मात्र आता सुज्ञ नागरिक अशा भुलथापांना बळी पडणार नाहीत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.काळे गटाने स्वामी समर्थांच्या सभामंडपाला विरोध दर्शविल्याची बाब त्यांनी निषेधार्ह असल्याचे स्पष्ट केले. धार्मिक स्थळांच्या विकासकामांमध्ये अडथळे निर्माण करणे आणि त्यावरून राजकारण करणे, हे कोणत्याही दृष्टिकोनातून योग्य नाही, असे त्यांनी सांगितले.

जनतेने सत्य परिस्थिती समजून घेत अशा भोंदू एजंटना वेळीच आवर घालण्याची गरज आहे.

# माळवाडगाव येथे पंचदिवसीय कीर्तन महोत्सवाला उत्साहात प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव येथे धर्मध्वजाच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित पंचदिवसीय कीर्तन महोत्सवाला भक्तिमय आणि उत्साही वातावरणात सुरुवात झाली. स्वामी अरूणनाथगिरी महाराज यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर कविराज महाराज झावरे (पारनेर) यांच्या प्रभावी कीर्तनाने उपस्थित भाविकांना भक्तिरसात तल्लीन केले. माळवाडगावचे ग्रामदैवत असलेल्या भवानी देवी मंदिराच्या प्रांगणात ग्रामस्थांनी चार वर्षांपूर्वी ७५ फूट उंचीचा धर्मध्वज उभारला आहे. या धर्मध्वजाच्या वर्धापनदिनानिमित्त दरवर्षी पंचदिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदाही महंत भास्करगिरी महाराज व महंत रामगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने दि. १७ एप्रिल ते २१ एप्रिल दरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. १७ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, बाजार समितीचे ज्येष्ठ संचालक गिरिधर आसने, भाजपा तालुका सरचिटणीस डॉ. शंकरराव मुठे, माजी संचालक बबनराव मुठे, तसेच सारंगधर आसने, नानासाहेब आसने, सुदामराव आसने, पत्रकार विठ्ठलराव आसने, भाऊसाहेब काळे, प्रमोद आसने, दिलीपराव हुरुळे, आसने गुरुजी, यशवंतराव हुरुळे, बाबुराव दळे, भाऊसाहेब आसने, सतीश आसने, सुधीर आसने, अमोल मोरे, रावसाहेब काळे, दादासाहेब अनुसे, उद्धव आसने, दत्तात्रय मोरे, स्नेहल काळे, योगेश लटमाळे, राजेंद्र आसने, पोलीस पाटील मधुकर बनसोडे, नितीन बोरुडे, श्रीराम हुरुळे, परमेश्वर गाढे, बापूसाहेब आसने, योगेश आसने, लखन महाराज, कृष्णा महाराज हापसे, बाळासाहेब महाराज पवार, काशिनाथ महाराज टेकाळे, भालदार चोपदार कैतके बंधू आदी मान्यवर उपस्थित होते.



दीपप्रज्वलनानंतर झालेल्या कीर्तन सोहळ्यात कविराज महाराज झावरे यांनी आपल्या ओजस्वी वाणीतून भक्ती, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला. यावेळी सुभाष बाबुराव आसने व विजय दिनकर आसने यांनी महाराजांचे संत पूजन केले तर सह्याद्री मित्र मंडळ व समस्त भजनी मंडळ, माळवाडगाव यांनी भाविकांना भोजन दिले. यावेळी परिसरातील भाविक भक्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजप सोशल मीडिया सेलचे तालुका संयोजक व पत्रकार संदीप आसने यांनी केले.

## जप्त मालमत्तेचे कुलूप तोडून प्रवेश,गुन्हा दाखल

**श्रीरामपूर, :** ४५ लाख रूपये घेतलेल्या कर्जाचे हप्ते न भरल्याने जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेचे कुलूप तोडून त्यात प्रवेश केला म्हणून श्रीरामपुरातील दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीरामपूर येथील वॉर्ड नं. १ मध्ये राहणाऱ्या गार्डन रेसिडेन्सी, मिल्लतनगर येथील अमीन यासीन शहा व शगुप्ता अमीन शहा या दोघांना जानेवारी २०२० मध्ये यांच्या दोन मालमत्ता गहान ठेवून ४५ लाखांचे लोन येथील फायनांशियल सर्व्हिसेस प्रा.लि. चे विस्तार अधिकारी-केतन सुभाष रूपनर यांच्या फायनान्स कंपनीने दिले होते. परंतू, गेल्या दोन वर्षांपासून घेतलेल्या कर्जाची त्यांनी परतफेड न केल्याने त्यांच्यावर सरफेसी कायदा २००२ अंतर्गत कारवाई सुरू केली होती. मुख्य न्याय दंडाधिकारी यांनी त्यानंतर सदर मालमत्ता ताब्यात घेण्याचे आदेश दिले होते. त्याची अंमलबजावणीसाठी कोर्ट कमिशनर म्हणून राजेंद्र करांडे यांची नियुक्ती झाली होती. कंपनीचा प्राधिकृत अधिकारी व करांडे केतन सुभाष रूपनर यांनी न्यायालयाच्या आदेशानुसार पोलीस संरक्षणामध्ये अंमलबजावणी करत दि. २७ रोजी सील करून कंपनीला सुपूर्द केली होती. मात्र, दुसऱ्या दिवशी २८ मार्चला सदर मालमत्तेला लावलेले कंपनीचे कुलूप व सील तोडून संबंधितांनी न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करत कायदेशीर ताब्यात असलेल्या कंपनीच्या मालमत्तेत अनधिकृत प्रवेश करून वास्तव्य केले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पुणे येथील फायनांशियल सर्व्हिसेस प्रा.लि. चे विस्तार अधिकारी-केतन सुभाष रूपनर यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अमीन यासीन शहा, शगुप्त अमीन शहा यांच्याविरूद्ध श्रीरामपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

## साईचरण पादुकांचे नवनागापूरात भव्य आगमन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** साईभक्तांसाठी अत्यंत पवित्र आणि ऐतिहासिक क्षणाचा अनुभव देणारा सोहळा सोमवारी, दि. २० एप्रिल २०२६ रोजी पार पडणार आहे. श्री क्षेत्र शिर्डी येथून सच्चिदानंद सद्गुरू श्री साईनाथ महाराजांच्या मूळ चरणपादुकांचे एमआयडीसी नवनागापूर येथील श्री साईबाबा मंदिरात सकाळी ८ वाजता भव्य आगमन होणार आहे. या सोहळ्याला जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, साईबाबा संस्थान शिर्डीचे अध्यक्ष शिवाजी कचरे तसेच कार्यकारी अधिकारी गोरख गाडीलकर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. याशिवाय जयहिंद माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे, मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष आकाश कोल्हाळ व वन अधिकारी बाळासाहेब सुंबे यांच्या प्रयत्नांतून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पादुकांच्या आगमनानंतर चेतना कॉलनीतील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातून ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून ती साईबाबा मंदिरात येऊन विसावेल. सकाळी ८ ते १० या वेळेत मिरवणूक, तर सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत दर्शनासाठी मंदिर खुले राहणार आहे. दुपारी ३ ते ६ या वेळेत ह.भ.प. विक्रम महाराज अवचिते यांचे भजन व कथा, तर सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. बाळकृष्ण महाराज ताहाराबादकर यांचे कीर्तन होणार आहे. दिवसभर दर्शनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात प्रथमच साईबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि .२० एप्रिल २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>६९० | ५-२ | १५६<br>१२९<br>११० | ५६-७२-३०-९१-२४ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १७९<br>१६०<br>१३३ | ७-४ | १४९<br>१३०<br>११२ | ७६-३४-१२-९०-४८ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| ४८०<br>५७०<br>६६० | २-९ | १२६<br>१८०<br>११७ | २१-०९-३५-६७-९४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 460 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# अनुदान अपात्रतेचा आदेश रद्द करा

## संस्थाचालकांची शिक्षण मंत्र्यांकडे धाव; संस्थांना अर्थसाहित करण्यास विरोध कायम



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : शालेय शिक्षण विभागाने अनुदानास पात्र असलेल्या १२६२ शाळा आणि ८२७ तुकड्यांना स्वयं अर्थसाहित करण्याचा निर्णय घेतला आहे या निर्णयात शासनाने तात्काळ स्थगिती द्यावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची भेट घेतली यावेळी मंत्र्यांनी २८ एप्रिल पर्यंत याविषयी निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिल्याची माहिती संस्था चालकांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली .

शालेय शिक्षण विभागाने एक व दोन एप्रिल ला शासन निर्णयाद्वारे अनुदानास पात्र ठरलेल्या शाळा अपात्र ठरवत ३० एप्रिल पर्यंत सवय अर्थसाहित करण्याचे आदेश दिले होते.

स्वयं अर्थसाहित दर्जा न घेतल्यास शाळेची मान्यता रद्दच आहे निर्णय झाला आहे या विरोधात संस्था चालकांच्या महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने आक्षेप नोंदवला आहे. महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांची भेट घेतली. या भेटीत अपात्र शाळांसह संच मान्यता, पटपडताळणीसह इतर विषयांवर चर्चा केली. यावेळी आमदार रोहित पवार, डॉ. नरेंद्र काळे, माजी आमदार विजय गव्हाणे, प्रा. मनोज पाटील, वाल्मीक सुरासे, भास्कर म्हस्के, गजानन दिग्रसकर, जागृती धर्माधिकारी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### कर्जत तालुक्यात शिलाई मशिनचे आमिष दाखवत योजनेच्या नावाखाली

## लाडक्या बहिणींची लाखो रुपयांची फसवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : स्वयंरोजगाराचे आमिष दाखवून तालुक्यातील बचतगटांतील तब्बल ४३९ गरजवंत लाडक्या बहिणींची ४ लाख ८२ हजार ९०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. शिलाई मशिन योजनेच्या नावाखाली प्रत्येक महिलेकडून ११०० रुपये जमा केले. मात्र त्यानंतर एकाही महिलेस आजमितीस मशिन देण्यात न आल्याने आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्याने महिलांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणी कर्जत पंचायत समितीच्या महिला समुदाय व्यक्ती (सीआरपी) सरोज सुभाष सुतार यांनी थेट कर्जत पोलिस ठाण्यात धाव घेत लेखी तक्रार दाखल केली आहे. सरोज सुतार २०१९ पासून सीआरपी म्हणून बचतगटांना विविध शासकीय योजनांची माहिती देतात. याच विश्वासाचा गैरफायदा घेत प्रशांत अडसूळ (कोरेगाव ता.कर्जत) नामक व्यक्तीने त्यांच्याशी संपर्क साधला.

त्याने शिलाई मशीन योजनेत आपल्या कडील महिलांना ११०० रुपयांत शिलाई मशीन देण्याचे आमिष दाखवले. यासाठी बुकिंग रक्कम ऍडव्हान्स भरावे लागतील असे सांगत विश्वास संपादन केला. त्यानंतर सुतार व इतर महिलांनी रक्कम जमा करीत आपल्या संसाराला आर्थिक मदत होईल या आशेने प्रशांत अडसूळवर विश्वास ठेवला. मात्र लाखो रुपये जमा करून अनेक महिने उलटून देखील एकाही महिलेला शिलाई मशिन मिळाले नाही. तसेच भरलेले पैसे परत मागितल्यावर संबंधिताकडून

टाळाटाळ करण्यात आली. फोनही उचलणे बंद केल्याने लाडक्या बहिणींना आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्याने कर्जत पोलीस ठाण्यात संबंधित व्यक्तीवर तक्रार देण्यात आली.

## शहरटाकळी येथे महात्मा बसवेश्वरांना अभिवादन

**शहरटाकळी** : शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथे 'महात्मा बसवेश्वर' जयंती निमित्त ग्राम पंचायत व ग्रामस्थ व सर्व पक्षीय कार्यकर्त्यांच्या वतीने बसवेश्वराच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.



बाराव्या शतकातील थोर समाज सुधारक व देशातील करोडो वीरशैव -लिंगायत बांधवाचे श्रद्धास्थान महात्मा बसवेश्वर यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली, ग्रामपंचायत येथे महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेला सर्व पक्ष कार्यकर्त्यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ॲड. अनिल मडके , ऊपसरपंच राजेंद्र खंडागळे, ग्रामपंचायत सदस्य संदीप राऊत, संतोष शेटे, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब राजळे, दलात्रय गिरम ,संतोष हात्ते ,अरुण आपशेटे , संतोष गिरम, रामाप्पा गिरम , शिवाजी गिरम ,दिपक कनके, मिनीनाथ बोबडे, संदिप कोल्हे, उत्तम वाबळे सह सर्वपक्षीय कार्यकर्ते, ग्रामस्था मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### हजारो हापूस आंब्यांनी नवीपेठ येथील

## श्रीराम मंदिरात आकर्षक सजावट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अक्षय तृतीया या पवित्र आणि मंगलमय सणानिमित्त नवी पेठ येथील श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने श्रीराम मंदिरात हजारो हापूस आंब्यांची भव्य व आकर्षक सजावट करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिर परिसर सुगंधी आणि रंगीबेरंगी आंब्यांच्या सजावटीने नटला असून, या अनोख्या उपक्रमामुळे भाविकांमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले.

सकाळपासूनच मंदिरात भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. हापूस आंब्यांच्या सुवासाने संपूर्ण परिसर दरवळून गेला होता, तर मंदिरातील देखणे व नयनरम्य सजावट पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थिती लावली. सजावटीमुळे मंदिराचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते आणि प्रत्येक भाविक या दैवी वातावरणात हरखून जात होता. या प्रसंगी श्रीरामाची महाआरती मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाली. आरतीदरम्यान जय श्रीराम आणि जय हनुमान जयजयकारच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेत प्रार्थना केल्या आणि अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर पुण्यसंचय केला.

ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखील शेटिया सांगितले की, मंडळाच्या वतीने वर्षभर विविध धार्मिक उत्सव व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. श्रीराम जन्मोत्सव, हनुमान जन्मोत्सव, गोकुळ अष्टमी, अन्नकूट महोत्सव, देवदिवाळी ,प्रतिष्ठा द्वादशी यांसारखे उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. तसेच दर शनिवारी रात्री ८ ते १० या वेळेत संगीतमय श्री हनुमान चालीसा पाठ, भजन संध्या कार्यक्रमास तरुणांचा वाढता प्रतिसाद पाहून ट्रस्ट वतीने येत्या शनिवार पासून बैठक व्यवस्था वाढविण्यात येणार आहे .

अक्षय तृतीया निमित्त करण्यात आलेली ही आंब्यांची सजावट केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून, सामाजिक एकोप्याचेही दर्शन घडवणारी ठरली. मंदिर परिसरात स्वच्छता, सुंदर रोषणाई आणि शिस्तबद्ध व्यवस्था यामुळे कार्यक्रम अधिक यशस्वी ठरला. ट्रस्ट चे सेवेकरी नी भाविकांना योग्य मार्गदर्शन करत सुरळीत दर्शन व्यवस्था ठेवली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे श्रीराम मंदिर नवीपेठ पुन्हा एकदा श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक परंपरेचे केंद्रबिंदू ठरले असून सर्व नगरवासीयांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले.

### शेवगावातील पेशवेकालीन गढी


## ऐतिहासिक वारसा जपण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : शेवगाव शहराच्या मध्यवस्तीत ऐतिहासिक . वारसा असलेल्या जून्या कोर्टाच्या गढ़ीच्या जागेवर होणारे अतिक्रमण रोखावें ..या गढीवरील पेशवे कालीन श्री गणश देवस्थानाचे. पावित्य जपावे तसेच माधवराव शिंदे यांच्या ऐतिहासिक वाड्याचे जतन व्हावे, अशी मागणी शेवगावच्या ज्येष्ठ नागरिक मंचने केली आहे.

हा परिसर सध्या जिल्हा परिषदेच्या ताब्यात असून पूर्वी येथील ऐतिहासिक शिंदे वाड्यात इंग्रजाच्या राजवटीत कोर्ट भरत असे . स्वातंत्र्या नंतर शेवगाव तालुका न्यायालय भरत असे . सध्या ते पिरी रस्त्यावर उभारण्यात आलेल्या न्यायालयाच्या नविन इमारतीत स्थलांतरित झाल्यापासून तेथे जिल्हा परिषद मराठी मुलींची प्राथमिक शाळा भरते .

मात्र काही दिवसा पासून या गढीला एका बाजूने कंपाऊड तोडून कोरण्याचा व आतिक्रम करण्याचा प्रकार घडतो आहे . काहीजण कचरा व घाण टाकून तो पेटवून देतात . जवळच सागवानाचा



वापर असलेल्या जून्या सुबक वाडयास या आगीपासून क्षिती पोहचू शकते तसेच त्यात शिकत असलेल्या लहान मुलींवर दूर्घटनेचा प्रसंग येऊ शकतो. आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या जागेला धोका निर्माण होऊ शकतो.

तसेच येथे कंपाउंडला एका बाजूने खिंडार पाडून त्या ठिकाणी म्हशीचा गोठा तयार केलेला आहे . यामुळे पेशवे कालिन श्री गणेश देवस्थानाचे पावित्र्य धोक्यात येऊन नागरिकांच्या धार्मिक भावना दुखु शकतात. दक्षिण बाजूने पक्की घरे बांधून अतिक्रमण होत आहे. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने त्वरित लक्ष घालावे. अन्यथा हा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी ती गढी पुरातत्व खात्याकडे वर्ग करावी असे आवाहन करण्यात आले आहे. या संदर्भात जिल्हा परिषदेच्या दुर्लक्षीत कारभारामुळे येथील नागरिकांमध्ये,विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

## बारामती-मोहटादेवी नवीन बस सुरू; नूतन बसचे कर्जतमध्ये स्वागत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : बारामती -मोहटादेवी एसटी बस सेवेचे कर्जतमध्ये कर्जत तालुका प्रवासी संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

रविवार, दि. १९ रोजी अक्षय तृतीयाचे औचित्य साधून बारामती आगाराने बारामती-मोहटादेवी नवीन बस सेवा सुरू केली आहे. सदर बस सेवेसाठी कर्जत तालुका प्रवासी संघटनेच्या वतीने बारामती आगाराशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. या कामी बारामती आगाराचे मोहिते आणि माळशिकारे यांच्यासह मिरजगाव बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रक निरंजन काळे प्रवासी संघटनेचे तालुकाध्यक्ष दिनेश ढवळे यांनीही बस सेवा सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यास यश आले.

बारामती-मोहटादेवी ही बस सकाळी ६:४५ वाजता बारामती येथून निघून सकाळी ९ वाजता कर्जत येथे पोहोचेल. सदरची बस कर्जत- मिरजगांव, कडा, धामणगाव, पाथर्डीमार्गे मोहटादेवी येथे दुपारी दीड वाजता पोहोचत एक तास दर्शनासाठी थांबून पुन्हा बारामतीकडे रवाना




होईल अशी माहिती चालक रोहित आटोळे व वाहक शिल्पा शिरसाठ यांनी दिली.

सदर बस कर्जत बस स्थानकात पोहोचताच कर्जत तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष दिनेश ढवळे, सचिव मुन्ना पठाण यांच्यासह पर्यावरणप्रेमी सर्व सामाजिक संघटनेचे शिलेदार नितीन देशमुख, राहुल नवले, संदीप कचरे, सुनील साबणे, कर्जत बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रक भांगे, वाहक पवार यांनी स्वागत केले. यावेळी बसच्या प्रवाशांनीही या बस सेवेबद्दल एसटी विभागाचे आभार मानले.

# शिरूर-श्रीगोंदा सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम संथगतीने!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : शिरूर-बेलवंडी श्रीगोंदा या महत्त्वाच्या मार्गावरील सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम प्रत्यक्षात संथगतीने सुरू असून त्याच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. सुमारे २०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाकडे नागरिकांनी मोठ्या अपेक्षेने पाहिले होते; मात्र दीड वर्ष उलटूनही कामाची गती आणि गुणवत्ता समाधानकारक नसल्याने जनतेत नाराजी पसरली आहे.

नगर-पुणे महामार्ग ते बेलवंडी गावापर्यंत रस्त्याचे काम अत्यंत मंद गतीने सुरू असल्याचे दिसून येते. या मार्गावर अनेक लहान-मोठे पूल प्रस्तावित आहेत. काही लहान पुलांची कामे पूर्ण झाली असली, तरी त्यावर सिमेंट काँक्रीट रस्ता



टाकण्याचे काम अद्याप बाकी आहे. कुकडीच्या पाण्याच्या चारीवरील पूल तसेच ढवळगाव, उक्कडगाव परिसरातील मोठे पूलही अपूर्ण अवस्थेत आहेत.

अनेक ठिकाणी मोठे खड्डे खोदून काम अर्धवट सोडल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. दीड वर्षात दीड पूलही पूर्ण झाले नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

तांत्रिकदृष्ट्या दररोज ४०० ते ५०० मीटर रस्ता पूर्ण होणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात केवळ १०० ते १५० मीटरच काम होत असल्याचे दिसते. त्यातही गुणवत्ता निकृष्ट असल्याचा आरोप नागरिक करत आहे. नियमानुसार मुरूमावर पाणी मारून रोलिंग, त्यावर जीएसबी खडी टाकून पुन्हा रोलिंग, त्यानंतर डीएलसी काँक्रीट आणि शेवटी पीक्युसि काँक्रीटीकरण करून २१ ते २८ दिवस पाणी मारणे आवश्यक असते. मात्र प्रत्यक्षात केवळ दोन दिवसच पाणी मारले जात असल्याचे स्थानिकांनी निदर्शनास आणले आहे.

देवदैठण व ढवळगाव गावांमध्ये रस्ता खोदून ठेवला असून प्रत्यक्षात काम सुरू नाही. परिणामी मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून नागरिकांना डोळे व श्वसनाचे आजार उद्भवत आहेत. देवदैठणमध्ये एका बाजूचा रस्ता पूर्ण करून दुसरी बाजू तशीच ठेवल्याने ग्रामस्थांमध्ये संताप वाढत आहे.गावची यात्रा असल्यामुळे यात्रेकर यांची मोठी तारांबळ होणार आहे.

दरम्यान, बेलवंडी फाटा ते ढवळगावदरम्यान ज्या ठिकाणी पूल पूर्ण झाले आहेत, त्या ठिकाणी तात्काळ सिमेंट काँक्रीट रस्ता करावा. गावांमध्ये रस्ता खोदून ठेवल्याने धूळ उडते, त्यामुळे नियमित पाणी मारणे गरजेचे आहे. कामादरम्यान 'जल जीवन' योजनेच्या पाइपलाईन फुटल्या असून, वारंवार सांगूनही दुरुस्ती होत नाही. उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी हाल सहन करावे लागत आहेत.

द•ख•ल



## निर्मल ब्राईट फ्युचर सीबीएसई स्कूलचा ९६.७७% निकाल

**ढोरजळगांव** : सीबीएसई बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत ९६.७७ टक्के निकालाची नोंद केली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत ऋग्वेद भारत विरकर याने (९४.४%) मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अभिनव गणेश सातपुते (८८.२ )याने द्वितीय, तर कार्तिकी विष्णू साबळे ( ८७.६%) हिने तृतीय क्रमांक मिळवला. विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मान्यवर संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ लक्ष्मणराव बिटाळ, शिक्षण विभाग उपप्रमुख अशोक आहेर, शाळेचे सहसमन्वयक ज्ञानेश्वर लबडे उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे आबासाहेब काकडे शिक्षण समूहाचे अध्यक्ष ड. डॉ. शिवाजीराव काकडे, विश्वस्त सौ. हर्षदाताई काकडे, शाळेचे मुख्य समन्वयक पृथ्वीसिंह काकडे, शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती वंदनाताई पुजारी, प्राचार्य दत्तात्रय मोरे, अॅकॅडमिक कॉर्डिनेटर बाळू निळ व श्रीमती रुपाली शेटे, वर्गशिक्षक रामा रेवाडकर यांनी अभिनंदन केले आहे.

## वांबोरीत अक्षय कर्डिले यांची भव्य प्रचार फेरी



**अहिल्यानगर :** राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी राहुरी तालुक्यातील वांबोरी गावात भव्य प्रचार फेरी काढत मतदारांशी थेट संवाद साधला. या प्रचार फेरीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून गावभर भाजप महायुतीच्या घोषणांनी वातावरण अक्षरशः दुमदुमून गेले.

प्रचार फेरीदरम्यान गावातील विविध ठिकाणी मतदारांनी अक्षय कर्डिले यांचे जल्लोषात स्वागत केले. फुलांची उधळण करत आणि जयघोष करत कार्यकर्त्यांनी संपूर्ण परिसर उत्साहाने भारावून टाकला. विशेष म्हणजे महिलांनी औक्षण करून कर्डिले यांना आशीर्वाद दिला, ज्यामुळे प्रचार फेरीला भावनिक व उत्सवी स्वरूप प्राप्त झाले.

अक्षय कर्डिले यांनी या दौऱ्यात घरोघरी भेट देत नागरिकांशी संवाद साधला. प्रत्येक घरात जाऊन त्यांनी मतदारांचे प्रश्न जाणून घेतले आणि विकासाच्या मुद्द्यावर आपली स्पष्ट भूमिका मांडली. स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी केलेल्या विकासकामांचा वारसा पुढे नेण्यासाठी मला संधी द्या, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## चालण्यातून आरोग्यक्रांतीचा नवा मार्ग : अशोक सब्बन

**अहिल्यानगर** : निरोगी व सुदृढ आरोग्याचा संदेश देत एज लॉकिंग वॉकिंग स्ट्रीट या अनोख्या उपक्रमाची शहरात सुरुवात करण्यात आली आहे. जीवनशैलीतील सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि नागरिकांना नियमित चालण्याची सवय लागावी या उद्देशाने हा निगेंट्रॉपी आधारित अभियान पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने राबविण्यात आला आहे।

या उपक्रमांतर्गत पंपिंग स्टेशन ते कराळे जिम या मार्गावर सुमारे ३० मिनिटांचे वॉकिंग करण्यात आले. नागरिकांना दररोज चालण्याचे महत्त्व पटवून देत आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी ड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, बीर बहादूर प्रजापती, अशोक भोसले, पोपट भोसले, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. अमित थोरात, प्रकाश गोसावी, प्रतीक म्हस्के, रमा आढाव, संजय शेकडे, बाजीराव गव्हाणे, लखन साळवे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते।

यावेळी बोलताना अशोक सब्बन यांनी सांगितले की, आज माणूस विज्ञान आणि तंत्रज्ञानात प्रगती करत असला तरी आरोग्याच्या बाबतीत मागे पडत आहे. आपण जास्त जगतोय, पण चांगलं जगत नाही. वय वाढतंय, पण आरोग्य घटतंय, ही वस्तुस्थिती बदलण्यासाठी जीवनशैलीत परिवर्तन आवश्यक आहे. चालण्यातून आरोग्यक्रांतीचा नवा मार्ग सापडू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

## अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ करा

**अहिल्यानगर** : अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी मानवी हक्क अभियान व अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन त्यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना निवेदन पाठविले. यावेळी जिल्हाध्यक्ष लखन साळवे, जिल्हा संघटक अशोक भोसले, शहर संघटक पोपट भोसले, आसाराम साबळे, ॲड. अमित थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी त्यांनी राज्यातील अनुसूचित जातींना मिळणाऱ्या आरक्षणाच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा मांडत, त्यातील असमतोल दूर करण्याची गरज अधोरेखित केली.

# भारतीय जैन संघटना विद्यालयात 'गांधी तीर्थ स्वच्छ शाळा' या राज्यस्तरीय स्पर्धेचे अंतिम मूल्यमापन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाघोली पुणे** - गांधीजींच्या स्वच्छतेच्या विचारांचे सुवर्णबीज बालमनात रुजवणे ही आजच्या काळाची अत्यावश्यक गरज आहे, असे प्रेरणादायी प्रतिपादन डॉ. गिरीश कुळकर्णी यांनी केले. पुण्यातील वाघोली येथील भारतीय जैन संघटना विद्यालयात 'गांधी तीर्थ स्वच्छ शाळा' या राज्यस्तरीय स्पर्धेचे अंतिम मूल्यमापन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या उपक्रमाचा मूलभूत हेतू म्हणजे विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनामध्ये स्वच्छतेची सवय, शिस्त आणि जीवनमूल्यांची रुजवण करणे हा आहे. कारण बालपणी अंगीकारलेले संस्कार आयुष्यभर मार्गदर्शक ठरतात, हा विश्वास या उपक्रमामागे दृढपणे उभा आहे.

मूल्यमापन प्रक्रियेदरम्यान श्री.गिरीश कुळकर्णी, श्री. चंद्रशेखर पाटील व श्री. संजय जाधव यांनी विद्यालयातील विविध उपक्रम, भौतिक सुविधा आणि स्वच्छतेसंदर्भातील व्यवस्थेची बारकाईने पाहणी केली. विद्यालयाने सलग तीन वर्षे या प्रतिष्ठित स्पर्धेत सहभाग नोंदवून आपली सातत्यशीलता आणि बांधिलकी अधोरेखित केली आहे.




शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यालयात तब्बल ११९ विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी या स्पर्धेदरम्यान करण्यात आली. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सामाजिक जाणिवा आणि गांधीवादी विचार यांचा संगम साधणारे हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे ठरले. 'गांधी विचार संस्कार परीक्षा' आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित शिक्षणाची बीजे पेरण्यात आली, तर गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.

निबंध, सारांश लेखन, वक्तृत्व, पोस्टर आणि रांगोळी अशा विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान, गांधी विचार, संविधानातील मूल्ये, लोकशाही, भ्रष्टाचारमुक्त भारत, राष्ट्रीय एकात्मता आणि जबाबदार नागरिकत्व यांसारख्या विषयांवर प्रभावी मांडणी केली. पथनाट्य, पोस्टर प्रदर्शन आणि जनजागृती कार्यक्रमांमधून स्वच्छतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्यात आला.

विद्यालय परिसरात विकसित केलेली परसबाग ही या उपक्रमाची एक प्रेरणादायी झलक ठरली. सेंद्रिय शेती पद्धतीने पिकवलेला भाजीपाला शालेय पोषण आहारात वापरून 'स्वावलंबन' आणि 'निसर्गस्नेह' यांचा सुंदर संगम साधण्यात आला. वृक्षारोपण, पर्यावरण रॅली, इको क्लब उपक्रम, जैवविविधता अभ्यास, कचरा व्यवस्थापन या संकल्पनांचा प्रभावी प्रसार करण्यात आला.

यासोबतच स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह व्यवस्थापन, हात धुणे अभियान आणि वैयक्तिक स्वच्छतेची तपासणी यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव केवळ शिकवली नाही, तर ती त्यांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवली गेली. परिणामी, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली आहे.

तसेच विद्यालयाने गांधी तीर्थ स्वच्छ शाळा सुंदर शाळा राज्यस्तरीय उपक्रम इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमाद्वारे जवळपास समाजातील पन्नास हजाराहून अधिक व्यक्तींपर्यंत पोहोचवण्याचा प्रभावी प्रयत्न केला. या सर्व उपक्रमांचे प्रभावी सादरीकरण श्री. गणेश क्षीरसागर व श्री. नितीन आखाडे यांनी केले.

स्पर्धेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी समन्वयक श्री. विष्णू देवडकर, श्री. संदीप लोणकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. प्रकल्प व्यवस्थापक श्री. सुरेश (बापू) साळुंके, श्री. प्रशांत पितळीया, प्राचार्य श्री. संतोष भंडारी, उपप्राचार्य श्री. पोपटराव गेठे आणि पर्यवेक्षक श्री. पांडुरंग पवार यांनी मार्गदर्शन करून या उपक्रमाला दिशा दिली. श्री. पांडुरंग पवार यांनी परीक्षकांचे स्वागत केले, तर श्री. विष्णू देवडकर यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

अशा प्रकारे, गांधी विचारांचा सुवास आणि स्वच्छतेची सवय यांचा संगम साधत हे विद्यालय विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल, संस्कारित आणि जबाबदार भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करत आहे.

## द•ख•ल

### जेजुरी गडावर आंबा नैवेद्य; आमरस प्रसाद वाटप

**जेजुरी (पुरंदर)** : अक्षय तृतीया निमित्त जेजुरी गडावर भक्तिमय वातावरणात विशेष पूजा व नैवेद्य कार्यक्रम पार पडला. श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्टतर्फे ११ डझन, तर श्री मार्तंड देवस्थानतर्फे ५१ डझन आंब्यांचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन दर्श खेडेकर व श्रीश खेडेकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. हरिद्रामार्चन पूजा कार्यक्रमाचे आयोजन मनीषा खेडेकर यांनी केले होते. कार्यक्रम स्व. सुगंधा शेळके व स्व. नामदेव पावले यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आला. भाविकांसाठी आमरस व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. गाभाऱ्यात आंब्यांची आकर्षक रांगोळी साकारण्यात आली तसेच मार्तंड भैरवांना आंब्याचा हार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमास पूनम शेळके, सारिका काळे, अभिजीत धामणे, प्रदीप पांडुळे, तुषार गाढवे, डॉ. राजेंद्र खेडेकर, संगीता कोंडिलकर, अजिंक्य सूर्यवंशी, सुरेखा भेलके, राजेश शाह, अशोक कोल्हे, डॉ. बिरेंद्र यादव यांसह पुजारी व सेवेकरी उपस्थित होते.



### राष्ट्रीय स्तरावर संत सावतमाळी इंग्लिश मीडियम स्कूलचा गौरव

**बारामती** : बारामतीतील डोर्लेवाडी येथील संत सावतमाळी इंग्लिश मीडियम स्कूल (पॉवर्ड बाय लीड) या विद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये लीड शिक्षा पुरस्कार मिळवत राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले. देशभरातील ५००० हून अधिक शाळांमधून झालेल्या स्पर्धेत विद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला. हा पुरस्कार सोहळा हैदराबाद येथे पार पडला. सुमित मेहता




(फाउंडर, लीड ग्रुप) आणि लौकिक सर (नॅशनल अकॅडमी हेड) यांच्या हस्ते विद्यालयास सन्मानित करण्यात आले. १००% नवीन शैक्षणिक धोरणावर आधारित अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी हे या यशामागील प्रमुख कारण ठरले. विद्यालयात कृतीतून शिक्षण, उपक्रमाधारित अध्यापन, कम्प्युटर कोडिंग यांसोबतच रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सर्जनशील विचारसरणी यांसारखे आधुनिक उपक्रम राबवले जात आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, कौशल्यविकास आणि नवोन्मेषी दृष्टिकोन वृद्धिंगत होत आहे. या यशात संस्थेचे चेअरमन अभिजीत निंबाळकर, सुमित्रा निंबाळकडी, प्राचार्य पृथ्वीराज नवले, जयश्री थोरात, सोनाली सूर्यवंशी, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालक यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. विद्यालयाच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही उत्कृष्ट कामगिरी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

### अक्षयतृतीये निमित्त आळंदीत पांडुरंगाचा देखणा अवतार

**आळंदी** : अक्षयतृतीयेच्या निमित्ताने ज्ञानेश्वर यांच्या संजीवन समाधीवर भगवान पांडुरंग यांचा आकर्षक अवतार साकारण्यात आला. चंदन ऊटी पाहण्यासाठी दिवसभर भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. पुण्यातील मूर्तिकार अभिजित ढोंडफळे व सहकाऱ्यांनी अत्यंत कौशल्याने ही मूर्ती साकारली. सूक्ष्म बारकावे आणि भावपूर्ण रचनेमुळे अवताराने भाविकांचे विशेष लक्ष वेधले. हा उपक्रम ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आणि स्वकाम सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. या उपक्रमामुळे परिसरात धार्मिक वातावरण अधिक प्रसन्न झाले असून, भाविकांनी समाधान व्यक्त केले.



## भोरमध्ये बसवेश्वर महाराजांची ८९५ वी जयंती उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोर** : जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९५ व्या जयंतीनिमित्त भोर शहरात विविध ठिकाणी भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भोर नगरपालिका तसेच तहसील कार्यालय येथे मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

भोर नगरपालिकेत नगराध्यक्ष रामचंद्र आवारे ,उपनगराध्यक्षा अँड. जयश्री शिंदे यांच्या हस्ते बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी नगरसेवक अमित सागळे, जगदीश किरवे, तृप्ती सुपेकर, गणेश पवार, राजकुमार शिंदे, राजेंद्र शिंदे पालिका अधिकारी महेंद्र बांदल ,राजेंद्र राऊत आदी उपस्थित होते.



शहरातील राजवाडा चौकातील तहसील कार्यालयातही जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नायब तहसीलदार डॉ.अरुण कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी डॉ.अण्णासाहेब बिराजदार, डॉ. अरुण बुरांडे, डॉ. विद्या बुरांडे, डॉ. पुष्कर बिराजदार, प्रसाद महाजन, पूनम महाजन, विजयकुमार केरूर, संगीता केरूर, समाधान पैलवान, दमयंती पैलवान, स्वप्निल पैलवान, वैशाली पैलवान, शरद साळमळगी, सुरेखा साळमळगी, अक्षय राशिनकर, शैला बिराजदार, अनिल कुमार धरणे, अमित माळी तसेच लिंगायत समाज बांधव उपस्थित होते.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी कायकवे कैलास (कष्ट हाच स्वर्ग) या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत समता, लोकशाही आणि सामाजिक ऐक्याचा संदेश आचरणात आणण्याचे आवाहन केले.

## पुण्यात दगडूशेठ गणपती चरणी हजारो आंब्यांचा नैवेद्य गणेश-शारदा विवाह सोहळा उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने पुण्याच्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात आज भक्ती आणि मांगल्याचा अपूर्व संगम पाहायला मिळाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य 'आंबा महोत्सव' आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये बाप्पाच्या गाभाऱ्यात हापूस आंब्यांची मनमोहक आरास करण्यात आली होती.

उत्सवाची सुरुवात पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सुक्त अभिषेकाने झाली. त्यानंतर पहाटे ४ ते ६ या वेळेत विदुषी मंजुषा पाटील यांच्या सुश्राव्य गायनाने 'स्वराभिषेक' संपन्न झाला.



सकाळच्या सत्रात मंदिरात गणेश याग करण्यात आला, ज्यामध्ये अनेक भाविक सहभागी झाले होते.

आजच्या दिवसाचे विशेष आकर्षण म्हणजे दुपारी १२ वाजून ५७ मिनिटांनी पार पडलेला भगवान श्री गणेश आणि देवी शारदा यांचा विवाह सोहळा. 'शारदेश मंगलम्' या विशेष मंगलमयी वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी पुणेकरांनी मोठी गर्दी केली होती. मंगलअष्टका आणि फुलांच्या वर्षावात हा विवाह सोहळा पार पडला.

## अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर भीमाशंकर कारखान्यामध्ये मिल रोलरचे पूजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर** : दत्तात्रयनगर, पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या गाळप हंगाम २०२६-२७ च्या पूर्व तयारी अंतर्गत मशिनरी ओव्हरऑयलिंग करुन व मिल रोलरचे पूजन रविवार (ता. १९) अक्षय तृतीयेच्या शुभमुर्हुतावर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे व व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील व संचालक मंडळाच्या शुभहस्ते करुन प्रत्यक्षात जोडणीचे कामास सुरुवात करण्यात आली.




दत्तात्रयनगर, पारगाव तर्फे अवसरी बु., ता. आंबेगाव येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यात रोलर पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मिल रोलर पूजन समारंभास कारखान्याचे संचालक अशोक घुले, रामचंद्र ढोबळे, बाबासाहेब खालकर, शांताराम हिंगे, आनंदराव शिंदे, मच्छिंद्र गावडे, बाजीराव बारवे, ज्ञानेश्वर अस्वारे, रामहरी पोंदे, संचालिका पुष्पलता जाधव, प्रिया बाणखेले, कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे, जनरल मॅनेजर (टेक्निकल) शिरीष सुर्वे, सेक्रेटरी रामनाथ हिंगे, मुख्य शेतकी अधिकारी दिलीप कुरकुटे, डिस्टीलरी मॅनेजर प्रतापसिंह सावंत, कामगार कल्याण अधिकारी सुरेश शिंदे, सिव्हील इंजीनिअर अमीर पठाण, पर्चेस अधिकारी ब्रिजेश लोहोट, सुरक्षा अधिकारी कैलास गाढवे व कामगार आदी उपस्थित होते.

अधिक माहिती देताना कारखान्याचे चेअरमन बेंडे म्हणाले की, कारखान्याच्या सन २०२६-२७ गळीत हंगामाची पूर्व तयारी सुरु झाली आहे. येत्या गळीत हंगामाकरीता कारखान्यातील मशिनरी ओव्हरऑयलिंग, रिपेअरींग कामे सुरु केली असून सदरची कामे दर्जेदार व वेळेत पुर्ण करुन ऑक्टोबर महिन्यात प्लॅन्ट गाळपासाठी सज्ज राहण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. कारखान्याचे संस्थापक - संचालक तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गाळप हंगाम २०२६-२७ मध्ये ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट्य वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक असणारी ऊस तोड वाहतूक वाहन टोळी, ट्रॅक्टर टायरगाडी, टायरबैलगाडी व ऊस तोडणी यंत्राचे करार सुरु केले आहेत. ऊस तोडणी यंत्राचे करार करणेसाठी इच्छुक असणा-या मशीन मालकांनी विभागीय शेतकी कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच येणारा गाळप हंगाम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाहतुक कंत्राटदार, तोडणी मजुर, अधिकारी व कर्मचा-यांनी सहकार्य करावे. सभासद व ऊस उत्पादक शेतक-यांनी आपला ऊस आपल्याच कारखान्यास गळीतास द्यावा असे आवाहन व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील यांनी केले.

## अक्षय तृतीये निमित्त धामणीत खंडोबा मंदिरात चंदनउटी सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी (ता. आंबेगाव)** : अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर धामणी येथील प्राचीन खंडोबा मंदिरात रविवारी (१९ एप्रिल २०२६) धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सदानंदाचा येळकोट, जय मल्हारच्या घोषात शेकडो भाविकांनी दर्शन घेतले. यावेळी स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या मूर्तींवर वसंत ऋतूनिमित्त तिसरी वासंतिक चंदनउटी साकारण्यात आली. या आकर्षक चंदनउटीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. कार्यक्रमात जोडप्यांच्या हस्ते वसंतपूजा, दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक करण्यात आले. खंडोबाला पुरणपोळी, भजी व कुरडईचा नैवेद्य दाखवून आरती करण्यात आली. मंदिरात उष्णतेचा प्रभाव कमी करण्यासाठी झेंडू, गुलाब व इतर फुलांनी सजावट करण्यात आली होती. पहाटे महिला भाविकांनी मंदिर परिसरात रांगोळ्या काढल्या. चंदनउटी लेपनानंतर भाविकांना कपाळी चंदन व भंडारा लावण्यात आला. चैत्र पौर्णिमा व अक्षय तृतीयेच्या निमित्ताने पुणे, नगर, नाशिक, मुंबई, भोसरी व पिंपरी-चिंचवड परिसरातून भाविक सहकुटुंब उपस्थित होते. मंदिर परिसरात जागरणाचे आयोजनही करण्यात आले. धामणी येथे गेल्या काही वर्षांपासून गुढीपाडवा, चैत्र पौर्णिमा व अक्षय तृतीया या दिवशी पारंपरिक पद्धतीने चंदनउटी सोहळा साजरा केला जात असल्याची माहिती देवस्थानच्या सेवेकऱ्यांनी दिली.



## पुरंदर तालुक्यातील शेतकरी कन्येची सुवर्ण कामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस:** पुरंदर तालुक्यातील मांढर येथील दक्षता दत्तात्रय पापळ हिने एम.एस्सी. वनशास्त्र पदविका परीक्षेत सुवर्ण पदक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या ४४ व्या पदवीदान समारंभात माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. शेतकरी कुटुंबातील दक्षताचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मांढर येथे झाले. पुढे माध्यमिक शिक्षण शिरवळ व सातारा जिल्ह्यातील खंडाळा




येथे पूर्ण करून तिने परभणी येथे बी.एस्सी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर वनशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत तिने हे यश मिळवले. आपल्या यशामागे आई-वडील, भाऊ तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याचे दक्षताने सांगितले. स्पर्धा परीक्षांद्वारे उच्च पदस्थ अधिकारी होण्याची इच्छा तिने व्यक्त केली.पदवीदान समारंभास कुलगुरू डॉ. संजय भावे, माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर, डॉ. सुभाष पुरी यांसह कृषी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दक्षताच्या या यशाबद्दल पुरंदर तालुक्यात सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे.

## आळंदीत पत्रकारांचा गौरव; तक्षशिला बुद्ध विहार समितीचा उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी** : समाजातील घडामोडींचे वस्तुनिष्ठ चित्रण करून लोकशाहीची चौथी बाजू मजबूत करणाऱ्या पत्रकारांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी तक्षशिला बुद्ध विहार समितीच्या वतीने विशेष सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. पोलीस स्टेशन समोरील तक्षशिला बुद्ध विहार येथे रविवारी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी विविध वृत्तपत्रांतील पत्रकारांचा शाल, श्रीफळ व लेखणी देऊन सत्कार करण्यात आला. दै. पुढारीचे पत्रकार तथा हुतात्मा राजगुरू पत्रकार संघ, खेड तालुक्याचे नवनियुक्त अध्यक्ष श्रीकांत बोरावके, दै.सामनाचे पत्रकार व नवनियुक्त कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, दै.राष्ट्रसह्याद्रीचे पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघ, पुणे जिल्ह्याचे नवनियुक्त कार्याध्यक्ष दिनेश कुऱ्हाडे, दै.प्रभातचे पत्रकार महादेव पाखरे तसेच पत्रकार ज्ञानेश्वर कुऱ्हाडे यांचा विशेष गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाचे आयोजन तक्षशिला बुद्ध विहार समितीच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी ज्ञानेश्वर रंधवे, विश्वनाथ थोरात, प्रवीण रंधवे, आनंद रणदिवे, सुभाष भोसले, विनायक गायकवाड, नामदेव सुरपल्लीकर, बाळासाहेब भोसले, भिमराव थोरात, नितीन थोरात, अशोक थोरात, संजय रंधवे, प्रशांत रंधवे, प्रभानंद शेलार, प्रमोद भालेराव, चारूदत्त रंधवे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आयु.आनंद रणदिवे म्हणाले, पत्रकार हा समाजाचा आरसा असून त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी आहे.

सन्मानाला उत्तर देताना सत्कारमूर्तींनी समितीचे आभार मानत सामाजिक बांधिलकी जपत जबाबदारीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## पुरंदरात टोलविरोधात आंदोलन तीव्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड** : पुरंदर तालुक्यातील बेलसर, तक्रारवाडी आणि जेजुरी परिसरात सुरू होणाऱ्या टोलवसुलीविरोधात स्थानिक नागरिक, शेतकरी आणि व्यापाऱ्यांमध्ये तीव्र संताप उसळला असून टोलमाफीच्या मागणीसाठी आंदोलन आक्रमक झाले आहे. स्थानिकांना सवलत न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

बेलसर आणि तक्रारवाडी येथील नव्या टोलनाक्यांवर स्थानिकांकडून टोल वसुली होणार असल्याने असंतोष वाढला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते संदीप जगताप यांनी याला विरोध दर्शवत विकासासाठी जमीन देणाऱ्यांवर टोल लादणे अन्यायकारक असल्याचे म्हटले आहे.

सासवड ही प्रमुख बाजारपेठ असल्याने जेजुरी परिसरातील शेतकऱ्यांची रोजची ये-जा होते. टोल लागू झाल्यास खर्च वाढून शेतकरी व लहान व्यापाऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. जेजुरी टोलनाक्यावर टोलवसुली सुरू होताच नागरिकांनी निदर्शने करत तीव्र विरोध दर्शवला.

> स्थानिक शेतकरी आणि कष्टकऱ्यांवर टोलचा बोजा टाकणे अन्यायकारक आहे. ‐ संदीप जगताप चार ते पाच दिवसांत तोडगा काढू. ‐ विजय शिवतारे २० किमी परिसरातील वाहनांना टोलमाफी मिळालीच पाहिजे. ‐ शिवराज झगडे

> स्थानिक नागरिकांनी टोलविरोधी भूमिकेला एकमुखी पाठिंबा दर्शवला असून, सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

परिस्थिती लक्षात घेता आमदार विजय शिवतारे यांनी मध्यस्थी करत आंदोलकांशी संवाद साधला. टोल तीन महिन्यांच्या चाचणी तत्त्वावर असून स्थानिकांच्या हितासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चार ते पाच दिवसांत तोडगा काढण्याचे आश्वासन देत संयम राखण्याचे आवाहन केले.

खंडोबा देवस्थानचे विश्वस्त शिवराज झगडे यांनी २० किलोमीटर परिघातील स्थानिक वाहनांना टोलमाफी देण्याची मागणी केली आहे. स्थानिकांना सवलत मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यात चर्चा सुरू असून लवकर निर्णय अपेक्षित आहे.

## स्वप्नील बरकडे 'आरोग्यरत्न' पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी** : सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे पिसुर्टी येथील स्वप्नील गोपीनाथ बरकडे यांना यावर्षीचा प्रतिष्ठित 'आरोग्यरत्न' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त पिसुर्टी (ता. पुरंदर) येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्या वतीने लुंबिनी बुद्ध विहार, पिसुर्टी येथे विशेष पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना देखील यावेळी विविध पुरस्काराने गौरविण्यात आले. दत्तात्रय बाबूराव भुजबळ यांना भिमरत्न सामाजिक पुरस्कार, अपुर्व दिलीप बरकडे यांना शिक्षण रत्न पुरस्कार, प्रशांत आनंता भुजबळ यांना कृषी रत्न पुरस्कार तर महादेव शंकर बरकडे यांना व्यवसाय रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



स्वप्नील बरकडे हे सध्या 'आनंदी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'चे संचालक डॉ. सुमित काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहेत. आरोग्य सेवेप्रती असलेली त्यांची निष्ठा आणि गरजूंना मदत करण्याची वृत्ती वाखाणण्याजोगी आहे. केवळ आरोग्यच नव्हे, तर सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि उद्योग क्षेत्रातही ते नेहमीच अग्रेसर असतात. त्यांच्या याच चौफेर सामाजिक कार्याची दखल घेत समितीने त्यांना या विशेष सन्मानाने गौरविले.

या पुरस्कारामुळे स्वप्नील बरकडे यांच्याबरोबरच दत्तात्रय भुजबळ, अपूर्व बरकडे, प्रशांत भुजबळ, महादेव बरकडे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी पुणे जिल्हा परिषद सदस्य डॉ. प्राजक्ता दुर्गाडे, उपसभापती प्रवीण पाटील,पंचायत समिती सदस्य मोनिका कांबळे, माणिकराव चोरमले पाटील, अशोक बरकडे, जगन्नाथ बरकडे, राजेंद्र बरकडे,बाळासाहेब चोरमले, शितल चोरमले, दादासाहेब बरकडे, दिलीप बरकडे, शुभम बरकडे, विशाल बरकडे,आयोजक दादासाहेब गायकवाड, सचिन काकडे, सोमनाथ गायकवाड, बाबासाहेब गायकवाड तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दखल




## पुण्यात परिक्रमा तंत्रनिकेतनचा झेंडा उंच; वैष्णवी शेंडगे राज्यात द्वितीय

**श्रीगोंदा** : पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत परिक्रमा तंत्रनिकेतनच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत संस्थेचा लौकिक उंचावला आहे. इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आयोजित स्पर्धा समर्थ सणस मैदानावर रंगली.या स्पर्धेत परिक्रमा पॉलिटेक्निकच्या तीन खेळाडूंनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये कु. वैष्णवी शेंडगे हिने २०० मीटर धावण्यात राज्यात द्वितीय क्रमांक पटकावत लक्ष वेधले. स्पर्धा अत्यंत चुरशीची असतानाही तिने दाखवलेला वेग आणि जिद्द पाहताही फक्त सुरुवात आहे असं म्हणावंसं वाटतं.तसेच कु. अविनाश गावडे व कु. अनुराधा धुमाळ यांनीही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत संस्थेच्या नावाला साजेसं योगदान दिलं.या यशाबद्दल परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक माजी मंत्री बबनराव पाचपुते, अध्यक्षा डॉ. प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार विक्रम सिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंचं अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.ट्रॅकवर धावली वैष्णवी, आणि नाव झळकलं परिक्रमेचं! या यशामागे प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अशोक राहिंज यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय निवारागृह येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

**अहिल्यानगर** : नवजीवन प्रतिष्ठान संचालित अहिल्यानगर महानगर पालिकेच्या पंडित दिनदयाल उपाध्याय निवारा गृह, काटवण खंडोबा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर आर्मी कॅम्प येथील मेजर उमेशकुमार ओझा यांच्यासह कु. ओझा उपस्थित होते. त्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी बोलतांना मेजर उमेशकुमार ओझा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत सम ाजात समानता, न्याय आणि बंधुता जपण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. निवारागृहातील आजी-आजोबांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी आणि दिन दलित तसेच महिलांविषयक आखलेल्या धोरणांबद्दल मनोगत व्यक्त केले. विश्वास जावळे यांनी सूत्रसंचालन केले. दिपक बत्तीशे यांनी प्रास्ताविक केले. ऋषिकेश राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी मेजर उमेशकुमार ओझा यांच्या वतीने त्यांच्या आईच्या स्मरणार्थ मिष्टान्न भोजन देण्यात आले. या कार्यक्रमास निवारा गृहातील राजेंद्र भोसले, विक्रांत साळी, वत्सला जगताप, सुमन उकिर्डे यांच्यासह इतर महिला, पुरुष लाभार्थी उपस्थित होते.

## पिंपळगावात नगरसेविका पडोळे यांचा नागरी सत्कार

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नूतन नगरसेविका सुजाता गोरख पडोळे यांचा त्यांच्या माहेरच्या पिंपळगाव (ता. पाथर्डी) येथे नागरी सत्कार मोठ्या उत्साहात संपन्न झाला. लेकीच्या निवडीमुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्राम स्थांनी अभिमानाने हा सोहळा साजरा केला. स्वर्गीय दादाभाऊ तुपे व ताराबाई तुपे यांची कन्या असलेल्या सुजाता पडोळे यांच्या निवडीबद्दल गावकऱ्यांनी जल्लोष करत त्यांचा सन्मान केला. या कार्यक्रमाला आमदार मोनिकाताई राजळे, म ोनाली ताई राजळे (सरपंच), भाऊ पाटील राजळे (पोलीस पाटील) यांच्यासह तुषार तुपे, दत्तात्रय तुपे, राजू तुपे, सदाशिव तुपे, अंबादास काळे, अक्षय तुपे, अतुल म्हस्के, शंतनु राजळे,राजूभाऊ धाडगे, गणेश जाधव, किरण कानडे, सुभाष धाडगे, दीपक गोरे, रमाकांत पाडळे, पोपट निमसे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निमगाव वाघा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

विद्यार्थ्यांच्या भाषणांनी व ग्रामपंचायत कार्यालयात जय भीमच्या गजराने अभिवादन

शिक्षण, संघटन आणि संघर्ष हाच प्रगतीचा मूलमंत्र बाबासाहेबांनी दिला -पै. नाना डोंगरे

अहिल्यानगर (प्रतिनिधी)- निमगाव वाघा (ता. नगर) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नवनाथ विद्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ तसेच धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नवनाथ विद्यालयात पार पडलेल्या मुख्य कार्यक्रमाला मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, शरद भोस, मंदा साळवे, स्वाती इथापे, तृप्ती वाघमारे, आप्पासाहेब कदम, तुकाराम पवार, रेखा जरे, निकिता रासकर-शिंदे, दिपाली ठाणगे-म्हस्के, तेजस केदारी, प्रमोद थिटे आदी मान्यवर उपस्थित होते.

# मंगळवारपासून १७ लाख कर्मचारी-शिक्षक बेमुदत संपावर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : रायातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी येत्या मंगळवार, दि. २१ एप्रिल पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समि तीच्या वतीने जिल्हाभरात तसेच शहरातील शासकीय कार्यालयांमध्ये बैठका घेऊन संपाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संपात राज्यभरातील सुमारे १७ लाख कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होणार आहेत. गेल्या दीड वर्षांपासून शासनाकडून कर्मचारी व शिक्षकांच्या विविध मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. यापूर्वीही लक्षवेधी आंदोलने, निवेदने, निदर्शने अशा सातपेक्षा अधिक आंदोलनांद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यावर ठोस निर्णय न झाल्यामुळे कर्मचारी वर्गात नाराजी आणि संताप वाढला आहे.

संघटनांच्या मते, पूर्वीच्या शासनकाळात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाहीत. आर्थिक व सेवाविषयक प्रश्नांवर चालढकल केली जात असल्याने कर्मचारी वर्गामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. सन २०२४ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या



सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन संदर्भातील अधिसूचना अद्याप लागू न झाल्याने, १ मार्च २०२४ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतनही मिळालेले नाही, ही बाब गंभीर असल्याचे संघटनांनी नमूद केले आहे.

तसेच, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०:२०:३० वर्षांनंतरचे लाभ हजारो कर्मचारी व शिक्षकांना मिळालेले नाहीत. राज्यातील सुमारे ३५ टक्के पदे रिक्त असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे आणि पदोन्नती प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत.

या संपात जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे हे प्रामुख्याने मागण्या आहेत.

संघटनांनी सांगितले की, केरळसारख्या राज्यात ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस आरोग्य विमा योजना उपलब्ध आहे, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही योजना लागू करावी. या बेम ुदत संपामुळे शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि विविध विभागांतील कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. नागरिकांना अनेक सेवांमध्ये अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

समन्वय समितीचे राज्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी राज्यातील सर्व कर्मचारी-शिक्षकांना एकत्र येऊन या संपात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. प्रलंबित १८ मागण्यांसाठी हा निर्णायक लढा असून, शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार जाहीर

**अहिल्यानगर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समितीने सन २०२५-२६ म ध्ये सिनिअर महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराची घोषणा विभागीय क्रीडा समितीचे अध्यक्ष व महात्मा फुले नूतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तानाजी जाधव यांनी जाहीर केले आहे.

सदरील पुरस्कार निवड समितीने निवड नामनिर्देशित / शिफारस केलेली महाविद्यालये :

उत्कृष्ट क्रीडा स्पर्धा आयोजन महाविद्यालय पुरस्कार : महात्मा फुले नूतन महाविद्यालय मि रजगाव व महिला गृह विज्ञान व संगणक शास्त्र महाविद्यालय लोणी राहाता, जि. अहिल्यानगर. ( ग्रामीण विभाग) सी.डी. जैन महाविद्यालय श्रीरामपूर जि. अहिल्यानगर.(शहर विभाग).

उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय या पुरस्कार : १. विद्यार्थी संख्या ०१ ते ७०० पर्यंत: त्रिमूर्ती महाविद्यालय, त्रिमूर्तीनगर, ता. नेवासा २. विद्यार्थी संख्या ७०१ ते १२०० पर्यंत: जाम खेड महाविद्यालय, जामखेड ३. विद्यार्थी संख्या १२०१ ते २००० पर्यंत: बाबूजी आव्हाड म हाविद्यालय, पाथर्डी ४. विद्यार्थी संख्या २००१ ते ३००० पर्यंत: आर.बी.एन.बी. महाविद्यालय, श्रीरामपूर ५. विद्यार्थी संख्या ३००१ च्या पुढे: संगमनेर महाविद्यालय संगमनेर : उत्कृष्ट क्रीडा संचालक पुरस्कार: प्रा. संजय धोपावकर, पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर

सन्मानपत्र / मानपत्र : (सेवानिवृत्तीसाठी ) :

श्री. शिवाजी बाळू उत्तेकर,सहाय्यक कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

प्रा. बाळासाहेब सिताराम शिंदे, शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक, अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर

प्रा.संजय रघुनाथ धोपावकर, शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक, पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर. पुरस्कार निवड समिती : डॉ. सॅव्हिओ वेगास (अध्यक्ष), सदस्य: डॉ. विनायक काळे, प्रा. सुभाष देशमुख डॉ. अजित कदम, डॉ. संजय गायकवाड, डॉ. उत्तम अनाप, डॉ. रवींद्र खंदारे,डॉ. विजय मस्के, डॉ. नितीन वाळुंज, डॉ. आण्णा मोहिते होते. सदरील पुरस्काराचे वितरण बुधवार दि.२८ एप्रिल २०२६ रोजी महात्मा फुले नूतन महाविद्यालय, मिरजगाव येथे होणार आहे अशी माहिती अहिल्यानगर जिल्हा विभागीय समितीचे सचिव डॉ.राजेंद्र देवकाते यांनी दिली.

## निवडणुकीच्या निमित्ताने करंजी, तिसगावात पोलिसांचा रुटमार्च

**करंजी** : राहुरी-नगर-पाथर्डी मतदार संघातील पाथर्डी तालुक्यातील संवेदनशील करंजी, मिरी व तिसगाव या गावात पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी शेवगाव नीरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली हा रुटमार्च घेण्यात आला. या



विधानसभेची पोटनिवडणुक शांततेत पार पाडण्यासाठी पाथर्डी पोलिसाकडुन आज करंजी गावात, बसस्थानकावर रुटमार्च काढण्यात आला होता. करंजीबरोबरच या मतदार संघातील मिरी व तिसगाव येथेही रुटमार्च काढण्यात आला.

आगामी २२३ राहुरी विधानसभा पोटनिवडणुक २०२६ च्या अनुषंगाने या रुटमार्चमध्ये पाथर्डी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी, सी आय एस एफ चे एएसआय बी. सी. भिल्ल, इतर अधिकारी २५ जवान व सी आर पी एफ चे एस आय प्रविणकुमार अधिकारी व १५ जवान, पाथर्डी पोलिस स्टेशनचे ५ अधिकारी, २० पोलिस अंमलदार, व १५ होमगार्ड हजर होते.

## भारतीय बौद्ध महासभेच्या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखा, जिल्हा शाखा व महिला शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित विविध शालेय स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. चित्रकला, वकृत्व आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन दि. ११, १२ व १३ एप्रिल रोजी सिद्धार्थनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे करण्यात आले होते.

चित्रकला स्पर्धेत एकूण ४८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. पहिली ते चौथी गटात प्रथम राजरत्न सनी महागडे, द्वितीय अर्णवी अमोल शेलार, तृतीय खुशी दिनेश चव्हाण



यांनी क्रमांक पटकावले. पाचवी ते दहावी गटात प्रथम मयूर रवी वाकोडे, द्वितीय अनुग्रह मनोज घोरपडे, तृतीय यश सचिन क्षेत्रे हे विजेते ठरले.

वकृत्व स्पर्धेत २८ स्पर्धकांनी सहभाग घेतला. पहिली ते सहावी गटात प्रथम प्रेरणा गितेश गायकवाड, द्वितीय आदिती विनोद गायकवाड, तृतीय प्रेम अजय गायकवाड, तर उत्तेजनार्थ सत्यम प्रमोद पडागळे यांचा समावेश होता. सातवी ते बारावी गटात प्रथम ज्ञानेश्वरी सुनिल खेडकर, द्वितीय प्रांजल भगवान थोरात, तृतीय वैष्णवी किरण लाड, तसेच उत्तेजनार्थ प्रतीक्षा दिपक केदारी यांनी यश संपादन केले.

रांगोळी स्पर्धेत २७ स्पर्धकांनी सहभाग घेतला. प्रथम अनुष्का चौधरी, द्वितीय अंशूकुमारी पंडित, तृतीय चैत्राली बारटक्के यांना पारितोषिके मिळाली. उत्तेजनार्थ हर्षदा काजळकर व प्रेरणा चक्रनारायण यांचा गौरव करण्यात आला. सर्व विजेत्यांना अनुक्रमे रोख रुपये ३००, २०० व १०० तसेच संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धांचे पारितोषिक वितरण जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, रविंद्र कांबळे, शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, हर्षाताई पंचमुख, रेखाताई भिंगारदिवे, रत्नमाला पाटोळे, मोहनजी शिरसाट, राजेंद्र पाडळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शहर शाखेचे अध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, उपाध्यक्ष मोहन शिरसाट, हिशोब तपासणी प्रमुख राजेंद्र पाडळे, संस्कार उपाध्यक्ष युवराज बनसोड, सचिव शशिकांत घोडके, संघटक राजेंद्र थोरात, संतोष जाधव, संजय डहाणे, अविनाश राक्षे आदींनी परिश्रम घेतले. तसेच जिल्हा शाखेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, सचिव रविंद्र कांबळे, भगवंतराव गायकवाड, राहुल कांबळे, महिला शाखेच्या जिल्हाध्यक्षा सुनीताताई गायकवाड, उपाध्यक्षा हर्षाताई पंचमुख, शहराध्यक्षा रेखाताई भिंगारदिवे, दीपा चव्हाण, विद्या शिंदे, शोभा घोडके यांनीही सहकार्य केले.

स्पर्धांचे परीक्षक म्हणून माजी प्राचार्य विलास साठे, प्राचार्य महावीर सोनटक्के, वस्तीगृह अधीक्षिका ज्योती गायकवाड, निवृत्त शिक्षिका रत्नमाला पाटोळे, तसेच शेखर उंडे यांनी काम पाहिले.

## बाबासाहेबांनी दिलेला समता, शिक्षण आणि संविधानाचा मार्गच खरा -विजय भालसिंग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरातील मार्केटयार्ड परिसरात त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून बाबासाहेबांच्या विचारांना आदरांजली वाहण्यात आली.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग व नाना डोंगरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रम ाला पंकज लोखंडे, प्राजक्ता लोखंडे, जयश्री गायकवाड, विठ्ठल उमाप, ज्योती साठे, राजू डोईफोडे, राजेंद्र लोखंडे, अमित लोखंडे, प्राजक्ता लोखंडे, नितीन साठे, पूजा लोखंडे, राजू उमाप, जावेद सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.

विजय भालसिंग म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले शिक्षण, समता आणि बंधुता यांचे मूल्य आजही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांनी भारतीय समाजाला संविधानाच्या माध्यम ातून न्याय, स्वातंत्र्य आणि समानतेचा मार्ग दाखवला. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि विषमता दूर करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

फक्त जयंती साजरी करून थांबून चालणार नाही, तर बाबासाहेबांचे विचार आचरणात आणणे गरजेचे आहे. शिक्षण हीच खरी शक्ती असून, प्रत्येक युवकाने ज्ञानाच्या बळावर स्वतःसह समाजाचा विकास साधण्याचे त्यांनी आवाहन केले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, संविधान हा देशाचा कणा आहे. त्याच्या माध्यमातून सर्व घटकांना समान न्याय मिळतो. समाजात एकोपा आणि बंधुभाव टिकवण्यासाठी त्यांच्या विचारांचा प्रसार होणे आवश्यक आहे. धर्मनिरपेक्षता, बंधुता आणि सामाजिक समता यांचे धडे बाबासाहेबांनी दिले. आजच्या काळात त्यांची अधिक गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

## जिद्दीच्या बळावर ‘एमबीबीएस’ प्रथम श्रेणीत डॉ. तनुजा ढम यांचे उल्लेखनीय यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : वैद्यकीय क्षेत्राची कोणतीही पार्श्वभूमी नसतानाही केवळ जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करणाऱ्या डॉ. तनुजा अन्नपूर्णा अशोक ढम यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांनी डॉ. वैशंपायन मेमोरियल गव्हर्मेंट मेडिकल कॉलेज, सोलापूर येथून एमबीबीएस पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत आपल्या कुटुंबाचे व परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे.

अहिल्यानगर येथे वास्तव्यास असलेल्या तनुजा यांचे वडील जीकेएन सिंटर मेटल्स प्रायव्हेट लिमिटेड या औद्योगिक कंपनीत कार्यरत आहेत, तर आई शाळेतील विद्यार्थ्यांचे क्लासेस घेऊन शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहेत. साध्या कुटुंबातून आलेल्या तनुजा यांनी आपल्या कुटुंबाच्या कष्टाची जाणीव ठेवत शिक्षणात सातत्य राखले आणि यशाचा नवा अध्याय लिहिला.




लहानपणापासूनच अभ्यासाची विशेष आवड असलेल्या तनुजा यांच्यासाठी वैद्यकीय क्षेत्र हे आव्हानात्मक होते, कारण कुटुंबात यापूर्वी कोणीही या क्षेत्राशी संबंधित नव्हते. तरीदेखील, आई-वडिलांची इच्छा पूर्ण करण्याचा निर्धार मनात बाळगून त्यांनी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश प्राप्त केले. त्यांच्या या प्रवासात अनेक अडचणी आल्या, मात्र त्या सर्वांवर मात करत त्यांनी स्वतःचे स्वप्न साकार केले.

डॉ. तनुजा आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, भाऊ तसेच मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना देतात. कुटुंबीयांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतः ची चिकाटी या तिन्ही गोष्टींमुळेच हे यश शक्य झाले, असे त्यांनी नमूद केले.त्यांच्या या यशाबद्दल अहिल्यानगर परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, समाजातील अनेकांनी त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले आहे. ग्रामीण व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात उत्तम सेवा देत समाजाच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्याचा त्यांचा मानस असून, पुढे एम.एस. करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## श्रीगोंद्यात अनेक ग्रामपंचायतीवर प्रशासक

### कामे ठप्प ग्रामसेवकांची झाली कोंडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील मुदत संपलेल्या जवळपास ७०ग्रामपंचायतींवर काही दिवसांपूर्वी सरपंच यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र प्रशासक असो अथवा ग्रामसेवक, त्यांना निधी खर्च करण्याचा अधिकार देण्यात आला नाही. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या निधीचे वितरण ठप्प झाले आहे. त्यामुळे सरपंच, ग्रामसेवक यांची कोंडी झाली आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील विविध विकास काम ांसाठी शासन, जिल्हा परिषद, पंचायत समितीकडून ग्रामपंचायतींना मार्चअखेरीस निधी वर्ग केला आहे. मात्र तालुक्यातील ७० ग्रामपंचतीवर प्रशासक आहेत यामध्येअजनूज,अनगरे,आढळगाव,उक्कडग ाव,उख्खलगाव,एरंडोली,कामठी,कोकणगाव,कोथ ूळ,कोंडगव्हाण,कोसेगव्हण,खांडगाव,कोरेगाव,क ोरेगव्हाण,कौठा,गव्हाणेवाडी,गार,घारगाव,घुगलव डगाव,घोडेगाव,घोटवी,चांडगाव,चांभुर्डी,चिखली ,चिखलटणवाडी,चिंभळा,चोराचीवाडी,टाकळी क डेवळीत,ढवळगाव,ढोरजा,देऊळगाव,दानेवाडी, निंबवी,निमगाव खलु पिंपरी कोलंदर,पिसोरेखांड, बाबुर्डी,बांगर्डे, बेलवडीकोठार,बोरी,भानगाव,म्हसे, म्हतारपिंपरी,मांडवगण,मुंगूसगाव, येवती,येळपणे, राजापूर, रायगव्हाण, रुईखेल, लिंपणगाव, वडाळी, वांगदरी, शिरसगाव बोडखा, शेडगाव, सांगवी दुमाला,सारोळा सोमवंशी,सुरेगाव, सुरोडी, हंगेवाडी,हिंगणी दुमाला हिरडगाव,महांडुळवाडी ,भावडी,आर्वी,जंगलेवाडी, जोशी वस्ती आणि मुंडेकरवाडी या ग्रामपंचायतीचा समावेश आहे या ग्रामपंचायतीवर प्रशासक आहे, अशा ग्राम पंचायतीचे सरपंच आणि ग्रामसेवक यांना निधी खर्च करण्याचा अधिकार प्रशासनाने दिला नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीत निधी येऊनही ठेकेदाराला वर्ग करण्यात आला नाही. त्यामुळे शाळा, अंगणवाडी, रस्त्यांसह इतर कामे करूनही ठेकेदार निधीपासून वंचित आहेत. परिणामी विकास कामांवर परिणाम होत आहे. निधी खर्च करण्याचे अधिकार द्यावेत, अशी मागणी होत आहे.

## संविधान वाटपातून आंबेडकरी विचारांचा प्रसार

**अहिल्यानगर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरातील उमेद सोशल फाऊंडेशनच्या वतीने संविधान वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून विविध सामाजिक संस्था व युवक मंडळांच्या प्रतिनिधींना भारतीय संविधानाच्या प्रतींचे वितरण करण्यात आले.

मार्केटयार्ड परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांना अभिवादन करत संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रम ास फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, जय युवा असोसिएशनचे अध्यक्ष ड. महेश शिंदे, सल्लागार ड. दीपक धिवर, सदस्य प्रकाश भालेराव, रवी साखरे, माहेर फाऊंडेशनच्या अध्यक्षा रजनी ताठे, ड. विद्या शिंदे, तन्वी साळवे, स्तवन साळवे, प्राची भालेराव, परी भालेराव, विजय लोंढे, रवी सुरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.संविधान वाटप उपक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये कायदेविषयक जाणीव निर्माण करणे, तसेच सामाजिक समता, बंधुता व न्याय या मूल्यांचा प्रसार करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या हक्कांसोबतच कर्तव्यांचीही जाणीव ठेवली पाहिजे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
सोमवार, दि.२० एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## झंवर चॅरिटेबल ट्रस्ट चेंज रिपोर्ट धर्मादाय आयुक्तांकडून रद्द

### ५५ वर्षानंतर एकाच वेळी दाखल १९ चेंज रिपोर्ट रद्द

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : बन्सीलाल रघुनाथदास झंवर चॅरिटेबल ट्रस्ट प्रकरणी दाखल करण्यात आलेला चेंज रिपोर्ट धर्मादाय आयुक्त व्ही. डी. शेंडगे यांनी रद्द केला आहे. या संदर्भात गोपाल अजितकुमार झंवर यांनी चेंज रिपोर्ट बाबतचा अर्ज धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दाखल केला होता.

एखादा ट्रस्ट स्थापन झाल्यानंतर ट्रस्टमध्ये काही बदल असल्यास तो चेंज रिपोर्ट ९० दिवसाच्या आत धर्मादाय आयुक्तंकडे दाखल करावा लागतो तसेच या दरम्यान च्या काळात तो दाखल झाला नाही तर पुढील ६० दिवसात तो विलंब फी भरून दाखल करावा लागतो. मात्र या दोन्हीही प्रक्रिया झंवर ट्रस्ट कडून सन २०२५ पर्यंत म्हणजे तब्बल ५५ वर्षा पर्यंत दाखल न झाल्याने गोपाल झंवर यांनी दाखल केलेला हा बदल अहवाल धर्मादाय आयुक्त यांनी रद्द केला आहे.

बन्सीलाल रघुनाथदास झंवर चॅरिटेबल ट्रस्ट ही १९६९ मध्ये नोंदविण्यात आलेली होती. रामनारायण रघुनाथदास झंवर, अजितकुमार रघुनाथ झंवर , जवाहर बन्सीलाल झंवर हे या ट्रस्टचे ट्रस्टी होते. हे सर्व ट्रस्टी मयत आहेत. घटनेत नवीन ट्रस्टी नेमणे तसेच मतदान घेणे या बाबी नमूद असताना १९६९ सालापासून तर धर्मादाय आयुक्त यांच्याकडे बदल अहवाल दाखल करेपर्यंत म्हणजे तब्बल ५५ वर्ष हा बदल अहवाल दाखल करण्यात आलेला नव्हता.

गोपाल झंवर यांनी एकाच वेळी १९ चेंज रिपोर्ट दाखल केले होते हे सर्वच्या सर्व चेंज रिपोर्ट धर्मादाय आयुक्तांनी रद्द केले आहेत. गेल्या ५५ वर्षांपासून ट्रस्ट कार्यान्वित नसल्यामुळे ती बंद आहे. याबाबत धर्मादाय आयुक्त यांनी संबंधितांना नोटीसही बजावली होती.धर्मादाय आयुक्त यांच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील ही ट्रस्ट अस्तित्वात नसल्याचे दाखविण्यात आले आहे. दरम्यान धर्मादाय आयुक्तांसमोर ट्रस्ट चा अर्ज निकाली काढल्याने बेलापूर एज्युकेशन सोसायटीवर त्याचा दूरगामी आणि गंभीर परिणाम होणार आहे. बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव एडवोकेट शरद सोमाणी यांनी बन्सीलाल झंवर ट्रस्ट अस्तित्वात तसेच कार्यान्वित असल्याचे खोटे रेकॉर्ड तयार करून शाळेचा कारभार पाहिला आहे.

धर्मादाय आयुक्तांनी दिलेल्या निकालामुळे बेलापूर एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्तांना पायउतार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणाची बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त, शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांनी मोठी धास्ती घेतली आहे.

## वारकऱ्यांबाबत अपशब्द वापरणाऱ्यांनी माफी मागावी : मंत्री विखे पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : वारकरी संप्रदायाच्या संदर्भात शरद पवार यांनी केलेले लिखाण अत्यंत खेदजनक असून, देव, देश आणि धर्मासाठी समर्पित भावनेने काम करणाऱ्या व्यक्तीबद्दल केलेल्या शब्दप्रयोगाचा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. ज्यांची हयात नास्तिक म्हणून मिरविण्यात गेली त्यांनी वारकरी संप्रदायाबाबत केलेल्या लिखाणाबद्दल आधी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली. या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात मंत्री विखे पाटील यांनी म्हटले आहे की, वारकरी संप्रदायाचा संदर्भ घेऊन शरद पवार यांनी पुरोगामी आणि प्रतिगामी अशा शब्दांचा खेळ करत वारकरी संप्रदायात एकप्रकारे फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, अनेक वर्षांची परंपरा असलेला हा वारकरी संप्रदाय अशा लिखाणाने विचलित होणार नाही; उलट हिंदुत्वासाठी संत परंपरेचा वारसा घेऊन एकसंघपणे अधिक जोमाने काम करेल आणि समाजालाही अध्यात्माने बांधून ठेवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील ह.भ.प. भास्करगिरी महाराज, आचार्य गोविंददेव गिरीजी महाराज आणि ह.भ.प. रामगिरी महाराजांची नावे घुसखोरांच्या यादीत टाकली आहेत. मात्र, या व्यक्तींनी समाजासाठी सर्वस्व अर्पण करून देव, देश आणि धर्मासाठी जीवन समर्पित केले आहे. त्यांच्याप्रती 'घुसखोर' सारख्या केलेल्या शब्दप्रयोगाचा मंत्री विखे पाटील यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

वारकरी कधीच निधर्मी होऊ शकत नाहीत; कारण वारकरी परंपरेलाच धर्माचे अधिष्ठान आहे. हे अधिष्ठान अशी मते व्यक्त करून दूर करण्याचा केविलवाना प्रयत्न कोणी करत असेल तर तो यशस्वी होणार नाही. प्रत्येक गोष्टीकडे 'व्होट बँक' म्हणून पाहणारे लव्ह जिहादपासून ते कॉर्पोरेट जिहादच्या एकाही घटनेवर शब्द सुद्धा बोलत नाहीत; मात्र परखडपणे यावर भूमिका मांडणारे हिंदुत्वनिष्ठ पवारांना वारकरी संप्रदायातील घुसखोर वाटतात, हे अतिशय निंदनीय आहे, असे ते म्हणाले.

महाराष्ट्रातील महापुरुषांना आणि हिंदू समाजातील जाती-जमातींना विभागण्यामध्ये ज्यांची संपूर्ण कारकीर्द गेली, त्यांना एकसंघपणे राहिलेला आणि वारकरी समुदायात समाविष्ट असलेला बारा बलुतेदार आणि अठरापगड जाती-जमातींमधील समाज एकत्रित राहतो हे पाहावत नसल्याची टीका मंत्री विखे पाटील यांनी केली.







## चांदा येथे गोवंश तस्करीचा पर्दाफाश ; तिघांविरोधात गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील चांदा येथील कुरेशी मोहल्ला परिसरात गोवंश तस्करीचा प्रकार उघडकीस आला असून पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम १९९५ (सुधारित २०१५) अंतर्गत करण्यात आली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १९ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास सहारा बेकरी परिसरात जनावरांची अवैध वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. या प्रकरणात आरिफ आतिफ कुरेशी, लियाकत इस्माईल कुरेशी व उबेद कुरेशी (पूर्ण नाव अज्ञात) यांच्यावर सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी सहा गोवंशीय जनावरे जप्त केली असून त्यांची किंमत सुमारे ९० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. यात तीन गायी व तीन बैलांचा समावेश आहे. पोलिसांनी पंचनामा करून जनावरे सुरक्षित स्थळी हलवली आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हेडकॉन्स्टेबल डी. एम. गावडे करीत असून इतर संशयितांचा शोध सुरू आहे.

## शेतात गळफास घेऊन शेतकऱ्याची आत्महत्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील माडेगव्हाण शिवारात ६२ वर्षीय शेतकऱ्याने शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना रविवारी सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भागवत नारायण शिरसाठ (वय ६२, रा. माडेगव्हाण, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) यांनी १९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ वाजता आपल्या शेतात दोरीच्या सहाय्याने झाडाला गळफास घेतला. ही बाब लक्षात येताच त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालय, नेवासा फाटा येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी संजय भागवत शिरसाठ (वय ४१) यांनी सोनई पोलीस ठाण्यात खबर दिली असून, पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक फौजदार एम. आर. अडकिते करीत आहेत. घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. गावात शोककळा पसरली आहे.

